शहराच्या मध्यवर्ती भागात नवीन फ्लॅट्स विकणे आहे
विष्णुप्रिया हाईट्समध्ये पहिला मजला कमर्शिअल आहे. उर्वरित ४ रेसिडेंसिअल 2BHK फ्लॅट्स प्राईम लोकेशन सह विकणे आहे. (दोन महिन्यात ताबा)
पत्ता : दक्षिण कसबा, आनंद मंगल कार्यालयाजवळ, दाते गणपती मंदिराजवळ
मो. : ९८८१२४५०२७
एकाच १RK फक्त मुली/महिलाकरिता भाड्याने देणे आहे

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

मंगल कार्यालय
लग्न, रिसेप्शन, साखरपुडा, मुंज, बारसे, वाढदिवस नव्या स्वरूपात सर्व सोयी सुविधांसह उपलब्ध.
सौभाग्य मंगल कार्यालय
आरटीओ जवळ, विजापूर रोड, सोलापूर, मो.: ९०९६९६६२२२

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २३५ वा | शनिवार, दि. २६ एप्रिल २०२५ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# लढाऊ विमानांच्या घिरट्या, सैन्याचा कसून सराव

**नवी दिल्ली (वृत्त सेवा):-** पहलगाम हल्ल्यानंतर संपूर्ण देशात संताप व्यक्त केला जात आहे. या हल्ल्याला जशास तसे उत्तर द्यावे, अशी मागणी देशभरातून केली जात आहे. आता विचार करण्याचा काळ संपला सरकारने थेट निर्णय घेतला पाहिजे, असेही मत जनता तसेच काही राजकीय पक्षाचे नेते व्यक्त करत आहेत.

असे असतानाच राजधानी दिल्लीत मोठ्या घडामोडी वाढल्या आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्त्वात दिल्लीत उच्चपदस्थांसोबत बैठका चालू आहेत. सोबतच सीमेवर तिन्ही सैन्यदलं सज्ज झाली आहेत. त्यामुळेच आता युद्धाचे काळे ढग जमा झाले आहेत का? असा प्रश्न सगळीकडे विचारला जात आहे.

दुसरीकडे पहलगाम हल्ल्यानंतर भारताची तिन्ही सैन्यदले हाय अलर्टवर आहेत. भारतीय नौदल, भूदल, वायूदलाने युद्धाभ्यास चालू केला आहे. वायूदलातर्फे अरबी समुद्रात युद्धनौका तैनात करण्यात आल्या आहेत. सोबतच पाकिस्तानी हद्दीत काय घडत आहे, यासाठी भूदलाची काही विमानंही आकाशात घिरट्या घालत आहेत. दुसरीकडे भूदलाने राजस्थानमध्ये ठिकठिकाणी युद्धाभ्यास केला आहे. वायूदलानेही सराव चालू केला आहे. वायूदलाने आपली लढाऊ विमाने सज्ज ठेवली आहेत. त्यामुळे आता एकीकडे दिल्लीत वाढत्या घडामोडी आणि दुसरीकडे सैन्यदलाची सज्जता पहता आगामी काळात नेमके काय होणार? याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.



### दिल्लीमध्ये नेमकं काय घडतंय?

पहलगाम हल्ल्यानंतर दिल्लीलमध्ये मोठ्या घडामोडी घडत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी आपला परदेश दौरा अर्धवट सोडून थेट भारतात परतले आहेत. त्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा, केंद्रीय संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, परराष्ट्रमंत्री एस जयशंकर तसेच अन्य उच्चपदस्थ अधिकारी यांच्या उपस्थितीत अनेक बैठका पार पडल्या आहेत. पाकिस्तानची कोंडी करण्यासाठी भारताने मोठे पाच निर्णय घेतले आहेत. त्यानंतर प्रत्युत्तर म्हणून पाकिस्ताननेही भारताविरोधात मोठी पावलं उचलली आहेत. त्यामुळे आता या दोन्ही देशांतील तणाव कमालीचा वाढला आहे. असे असतानाच अमित शाहा यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबतही एक बैठक घेतली आहे. त्यामुळेच आता काहीतरी मोठे घडणार का? असा प्रश्न विचारला जात आहे.

## मंगळवेढ्यात शेतकऱ्यांचा महामार्गावर रस्ता रोको

**मंगळवेढा (कटूसत्य वृत्त):-** उजनी लाभक्षेत्रात टेल एंडला असलेल्या भागातील उन्हाळी हंगामातील पाण्याची पाळी पुरेशा दाबाने न सोडल्यामुळे पिके जळून चालली असून संतप्त झालेल्या शेतकऱ्याने पंढरपूर विजापूर या महामार्गावर मरवडे येथे रस्ता रोको आंदोलन सुरू केल्यामुळे महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाली.

उजनी पाणी वाटपाचे तालुक्यातील नियोजन अधिकाऱ्याच्या मनमानी कारभारामुळे विस्कळीत झाले असून तालुक्यातील काही भागातील शेतीला पाणीच मिळत नाही त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात उभी पिके ऐन उन्हाळ्यात जळून चालली. परंतु अधिकाऱ्याची पाणी सोडण्याची मानसिकता होत नाही गेल्या काही दिवसापूर्वी



मारापुर येथील उजनी वितरिका क्रमांक 37 ला पाणी सोडले नाही म्हणून शेतकऱ्यांची ओरड ताजी असतानाच नंदुर, मरवडे, डोणज, कागष्ट, कात्राळ, हुलजंती, डिकसळ या भागातील ऊस शेतीला उन्हाळ्यातील दुसरी पाळी सोडण्यात आली नाही.

याबाबत शेतकऱ्यांना अधिकाऱ्यांना विचारण्यात केल्या असता अधिकाऱ्याकडून उजनी धरणात पाणी नसल्याचे कारण सांगत या शेतकऱ्यांना पाणी देण्यास चालढकल केली आहे. तर काही भागात सोडलेले पाणी पुरेशा दाबाने देखील नाही त्यामुळे शेतकऱ्याच्या शेतात असलेली उभी जळून चालली आहे. या भागातील शेतकय्राच्या पिकाचे वार्षिक नियोजन चुकणार आहे त्यामुळे शेतकऱ्याला हाताशपणामुळे उभी पिके बघताना मानसिकता होत नसल्यामुळे आज शेतकऱ्यांच्या भावना संतप्त होत मरवडे महामार्गावर रास्ता रोको आंदोलन सुरू केले.पाणी सोडण्याच्या बाबतीत टेल टू हेड नियमाचे पालन करता अधिकाय्रांनी मनमानी प्रमाणे चार दिवस पाणी सुरू असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

यावेळी निवेदन दिले.यावेळी ॲड नंदकुमार पवार, ॲड राहूल घुले, माणिक पवार, दत्तात्रय मासाळ अशोक पवार,दादा काकेकर, धन्यकुमार पाटील, सुदर्शन घुले, संतोष पवार, मेजर राहुल शिंदे, यांच्यासह या भागातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत ऐनवेळी केलेल्या रस्ता रोको आंदोलनामुळे गेल्या तीन तासापासून महामार्गावरून वाहतूक विस्कळीत झाली. उजनीचे अधिकारी व शेतकरी यांच्या अद्याप तोडगा निघाला नाही पोलीस निरिक्षक दत्तात्रय बोरिगिडे यांनी पोलीस बंदोबस्त तैनात केला आहे.

## सोलापुरात २५ पाकिस्तानी नागरिक; पालकमंत्री गोरे यांची माहिती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्ह्यात साधारणतः 25 च्या आसपास पाकिस्तानी नागरिक आहेत. त्यापैकी लॉंगटाईम व्हिसा असलेले 10-11 लोक आहेत. 14 लोकांना परत पाठवण्यासारखी परिस्थिती आहे. परंतु आत्ताच माझी पोलिस आयुक्तांशी चर्चा झाली आहे, ते सिंधी-हिंदू आहेत.

ज्या हिंदू बांधवांना पाकिस्तानमध्ये त्रास होतो, त्या त्रासाला कंटाळून आलेले काही लोक असू शकतात, जर ते हिंदू असतील तर त्यांच्याबद्दल आपल्याला विचार करावा लागेल. मी माझी भूमिका सरकारकडे मांडेन, असे सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सांगितले.

पालकमंत्री जयकुमार गोरे हे आज सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. सायंकाळी सोलापूर शहरात पत्रकार परिषद घेऊन गोरे यांनी पाकिस्तानी नागरिकांबाबत माहिती दिली. ते म्हणाले, सोलापूमध्ये सुमारे 25 च्या आसपास पाकिस्तानी नागरिक आहेत. त्यातील 14 लोकांना परत पाठविण्यासारखी परिस्थिती आहे. यासंदर्भात मी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी बोलणार आहे. त्या संदर्भात काय निर्णय घ्यायचा आहे, त्याचा विचार करण्यात येईल.

पाकिस्तातून आलेले हे नागरिक कशासाठी सोलापूरमध्ये आले आहेत, यासंदर्भात मी माहिती घेतलेली नाही. पण आपण त्यांना लॉंगटाईम व्हिसा दिला असेल तर काहीतरी कारण बघून दिला असेल. ज्या हिंदू बांधवांना पाकिस्तानमध्ये त्रास होतो, त्या त्रासाला कंटाळून आलेले काही लोक असू शकतात जर ते हिंदू असतील तर त्यांच्याबद्दल आपल्याला विचार करावा लागेल. तेवढा मोठा मी नाही. पण मी माझी भूमिका नक्की सरकारकडे मांडेन, असेही गोरे यांनी स्पष्ट केले.

**पाकिस्तानला परिणाम भोगावे लागतील**

कश्मीरमधील हल्ल्यासंदर्भात गोरे म्हणाले, कश्मीरमधील दहशतवादी हल्ल्याच्या प्रकरणावरून देशातील सर्वांच्या मनात प्रचंड चीड आहे. प्रचंड चीड आणणारं हे कृत्य आहे. नक्की याला उत्तर द्यावे लागेल. नरेंद्र मोदी यांनी याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कुठेही असला तरी त्याला शोधून त्याचा खात्मा केला जाईल. त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागतील.

### शरद पवार मोठे नेते; पण...

शरद पवार यांनी केलेल्या विधानावर गोरे यांनी भाष्य केले. ते म्हणाले, शरद पवार मोठे नेते आहेत. मात्र, अशा प्रसंगी प्रश्न निर्माण करणे, ही त्यांची जुनी सवय आहे. मात्र देश एकत्र आहे. देशाने एकत्र राहून मुकाबला केला पाहिजे. अशा संकटात या प्रवृत्तीचा नायनाट केला पाहिजे. अशावेळी सवार्नी एकत्र यायला हवे. कधी कधी पुलवामा हल्ल्यावरही शंका निर्माण केली, आता यावरही शंका घेतली जात आहे. मात्र त्याची चर्चा होऊ नये, एवढीच अपेक्षा आहे.

## सोलापुरात १०२५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चित

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गाववाड्यातील मिनी मंत्रालय समजल्या जाणाऱ्या ग्रामपंचायतींच्या सरपंचपदासाठी आरक्षणाच्या सोडती मंगळवारी काढण्यात आल्या. यातून 'कहीं खुशी, कहीं गम' असे संमिश्र चित्र पाहायला मिळाले.

सोलापूर जिल्ह्यातील १०२५ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीद्वारे निश्चित करण्यात आले. ज्या त्या तालुक्यातील तहसीलदारांच्या उपस्थितीत पुढील २०२५ ते २०३० या पाच वर्षासाठी ग्रामपंचायत सरपंच आरक्षण ठरले. आरक्षण सोडत काढताना गावागावांतील अनेक इच्छुक मंडळी उपस्थित होती. यात आरक्षणाचा फटका बसल्यामुळे काही जणांच्या पदरी निराशा आली, तर पूरक आरक्षणामुळे सरपंचपदाची संधी मिळण्याच्या आशेमुळे बरेच इच्छुक कामाला लागले. विशेषतः राजकीयदृष्ट्या संवेदनशील असलेल्या आणि तालुक्यातील बड्या राजकीय नेत्यांशी संबंधित असलेल्या गावांच्या ग्रामपंचायतींमध्ये सरपंच आरक्षणाकडे सर्वांचे लक्ष वेधले होते. यात काहीजणांनी समाधानाचा सुस्कारा सोडला. तर काहीजणांच्या आशेवर पाणी फेरले गेल्याचे दिसून आले.

अक्कलकोट तालुक्यातील ११८ ग्रामपंचायतच्या सरपंचपदाचे आरक्षण सोडतीतून ठरले. यात हन्नूर जेऊर, नागणसूर, कुरनूर, शिरवळ, चुंगी, पितापूर, वागदरी, कर्जाळ, हैद्रा आदी नेहमीच राजकीयदृष्ट्या चर्चेत राहणाऱ्या गावांमध्ये सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटाला लाभले. यातील काही



ठिकाणी महिलांना संधी मिळणार आहे. भाजपाचे आमदार सचिन कल्याण शेट्टी यांच्या गावाच्या सरपंचपदाचे आरक्षण खुल्या गटातील महिलेला मिळाले आहे.

दक्षिण सोलापूर तालुक्यातील ८६ ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षणाद्वारे निश्चित झाले. यात टाकळी, कुडल हत्तरसंग (अनुसूचित जाती), बोरामणी, होटगी, नांदणी, गुंजेगाव (ओबीसी), नुसती, कासेगाव, कुंभारी, भंडारकवठे, आहेरवाडी आदी गावांचे सरपंचपद खुल्या गटाला मिळाले आहे.

मंगळवेढा तालुक्यातील ७९ ग्रामपंचायतींचे सरपंच पदाचे आरक्षण ठरविण्यात आले. यापैकी ४६ गावांना खुल्या गटातील आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यात २३ महिलांचा समावेश आहे. माढा तालुक्यात अनुसूचित जाती ढवळस, आकुंबे, वडाची वाडी येथे आरक्षण निश्चित झाले. तर टेंभुर्णी, अंजनगाव खेलोबा, बारलोणी, पिंपळखुंटे, जामगाव, सापडणे, मोडनिंब आदी ठिकाणी खुल्या प्रवगार्साठी सरपंचपद आरक्षित झाले आहे. माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या निमगावसह पिंपळनेर, सुलतानपूर, उजनी, वाकाव, लऊळ आदी ठिकाणी खुल्या गटात महिला सरपंच होणार आहेत.

## काशमिरात अडकलेल्यांपैकी चौघे सोलापुरात सुखरूप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जम्मू-काश्मीरमध्ये पर्यटनासाठी सोलापुरातील १६९ जण गेले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाकडे प्राप्त झाली होती. जम्मू-काश्मीरमधील या पर्यटकांना सोलापुरात सुखरूप आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने समन्वयाची भूमिका बजाविण्यात आली.

जम्मू काश्मीरमध्ये गेलेल्या पर्यटकांपैकी ४ जण आज सोलापुरात सुखरूप परतले असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने देण्यात आली.

जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथील पर्यटकांवर दहशतवाद्यांनी मंगळवारी (ता. २२) हल्ला केला. त्यामुळे देशभरात संतापाचे वातावरण आहे. यामध्ये सोलापुरातील कोण पर्यटक आहेत? याची माहिती



घेण्यासाठी जिल्हा प्रशासनाने युद्ध पातळीवर प्रयत्न केले. या हल्ल्यामध्ये मृत्यू झालेल्या किंवा जखमी असलेल्या नागरिकांमध्ये सोलापूर जिल्ह्यातील नागरिक नसल्याची खात्री झाल्यानंतर या पर्यटकांना जिल्ह्यात सुखरूप आणण्यासाठी नियोजन करण्यात आले.

सोलापूर शहर व जिल्ह्यातील टुरिस्ट कंपन्या यांच्यासह हेल्पलाईनच्या माध्यमातून जिल्ह्यातील पर्यटकांची माहिती संकलित करण्यात होती. सोलापूर शहरातील ७७, माढ्यातील ५४, पंढरपुरातील २३, सांगोल्यातील ८ व माळशिरसमधील (पान 2 वर..)


अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री- पुरुषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या

जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ.अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ज्ञ)
B.H.M.S.,M.D (A.M) , M.D (Acu )., P. G ( Sexology )
२१ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
१ लाखांहून अधिक रुग्णांवर यशस्वी उपचार
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13


श्री स्वामी समर्थ

स्वामी सेवक
कै. कल्याणराव शि. इंगळे
श्री स्वामी समर्थांच्या १४७ व्या पुण्यतिथी निमीत्त कोटी कोटी प्रणाम
श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता अक्कलकोट नगरीत येणाऱ्या सर्व स्वामी भक्तांचे हार्दिक स्वागत
स्वागतोत्सुक

श्री. महेश क. इंगळे
चेअरमन
श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट
मा. नगराध्यक्ष तथा मा. नगरसेवक
देवस्थानच्या अधिपत्याखालील मंदीरे व देवस्थानच्या वतीने राबविले जाणारे उपक्रम
- श्री वटवृक्ष मंदिर वातानुकूलीत गाभारा व मंडप
- श्री वटवृक्ष मंदिरात कै. कल्याणराव इंगळे सभा मंडप
- श्री मुरलीधर मंदिर येथे नियोजीत भक्त निवास व दर्शन रांग
- भक्तांच्या सोईसाठी भक्त निवास
- तंत्र निकेतन विद्यार्थी वस्तीगृह
- बालकांकरीता शिशू विकास मंदिर
- वर्षभरातील सण, उत्सवप्रसंगी प्रसाद वाटप
- श्री वटवृक्ष मंदिर वातानुकूलीत परिसर
- श्री राम मंदिर
- श्री विठ्ठल मंदिर
- रुग्णांच्या सेवेसाठी रुग्णालय
- भक्त निवारा येथे गाईची गोशाळा
- तंत्र निकेतन महाविद्यालय
- वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना सेवेकऱ्यांना
- दैनंदिन मोफत भोजनप्रसादाची सोय
मंदिर परिसरातील उत्सव, यात्रा, सामुदायिक विवाह सोहळे यासाठी देवस्थानच्या वतीने धान्य स्वरुपात मदत, तसेच परगांवाहून दिंडी व पालखी सोबत पायी चालत येणाऱ्या भक्तांना तसेच पारायण सप्ताह, हरीनाम सप्ताह, व्रतवैकल्य, होमहवन, दत्तयाग, भजनकरी, वर्षभरातील सण, वटवृक्ष मंदिरात व मंदिराच्या अधिपत्याखाली असलेले मुरलीधर मंदिर, विठ्ठल मंदिर, राम मंदिर, येथे सालाबादाप्रमाणे होणाऱ्या उत्सवात सर्व भाविकांना भोजन महाप्रसादाची सोय इत्यादी उपक्रम देवस्थानच्या वतीने राबविले जातात.
आपले नम्र
श्री. महेश क. इंगळे – चेअरमन
श्री. आत्माराम मा. घाटगे – सेक्रेटरी
श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट विश्वस्त मंडळ
श्री म. व्यं. गोगी
श्रीम उ. क. सरदेशमुख
श्री.द.सि. हिरेमठ
श्री.वि.रा.दास
श्री.सं.न. शिंदे
श्री.प्र.ग.झपके
ट्रस्ट रजि.नं.ए ८५.
फोन - ०२१८१-२२०३२१, भक्त निवास ०२१८१-२२१९०९
रुग्णालय - ०२१८१-२२२२७२, Email shrivsmdevasthan@gmail.com
टीप - देणगीदारास ८० जी कलमान्वये आयकरात सवलत आहे.

## संपादकीय

# पुन्हा लक्ष्यभेदी?

नंदनवनातील जम्मू-काश्मीरच्याशापित नंदनवनातील पहलगाम येथे जे झाले त्याबद्दल दहशतवाद्यांची आणि त्यांच्या बोलविता धन्यांची निर्भर्त्सना करावी तितकी कमीच ठरेल. अश्राप पर्यटकांवर ज्या पद्धतीने या इस्लामी दहशतवाद्यांनी हल्ला केला ती दृश्ये पाहून कोणाच्याही मनात एकाच वेळी असहाय्यतेची आणि संतापाची भावना दाटून येईल.

या पर्यटकांतील फक्त पुरुषांनाच- आणि त्यातही बहुतेक हिंदू पुरुषांना – दहशतवाद्यांनी लक्ष्य केले. महिलांस सोडले त्यामागे स्त्रीदाक्षिण्य नाही. या महिलांस या हिंसक आठवणी आयुष्यभर छळाव्यात आणि हिंदू-मुस्लीम दुही त्यांच्या मनात कायमची राहावी हा यामागील उद्देश. यावरून या हल्ल्यामागे किती तयारी झालेली होती, हे दिसून येते. याआधीही दहशतवाद्यांनी जम्मू-काश्मिरात पोटापाण्यासाठी आलेल्या स्थलांतरित मजुरांस अनेकदा लक्ष्य केले. हेतू हा की ते करीत असलेली कामे विस्कळीत व्हावीत आणि नवे मजूर तेथे येऊ नयेत. तथापि थेट पर्यटकांवर इतक्या मोठ्या प्रमाणावर हल्ला झाल्याची घटना गेल्या कित्येक दशकांत घडलेली नाही. पर्यटन क्षेत्र हे त्या राज्याची अन्ननलिका आहे. स्थानिकांस जे काही चार पैसे कमावता येतात ते केवळ पर्यटनावर. आता याच पर्यटनावर दहशतवाद्यांनी घाला घातला. तसे करताना परत हिंदू पुरुषांस वेचून मारले. साहजिकच याचा परिणाम त्या राज्याच्या पर्यटन हंगामावर होणार आणि इतक्या वर्षांच्या हालअपेष्टांनंतर हे राज्य जरा कोठे आपल्या पावलावर उभे राहू शकेल असे वाटू लागले होते; ती शक्यता आणखी दुरावणार. जे झाले त्यामुळे सामान्यांच्याही भावना उचंबळून येतात आणि मनामनांत सूडाग्नी भडकू लागतो. यातूनच जम्मू-काश्मीरवर बहिष्कार टाका, त्या प्रदेशाची आर्थिक कोंडी करा, पाकिस्तानला धडा शिकवा इत्यादी भावना व्यक्त होताना दिसतात. जनसामान्यांच्या पातळीवर असे होणे साहजिक. पण राज्यकर्त्यांना असे भावनिक निर्णय घेऊन चालत नाही. त्यामुळे आताही पाकिस्तानला धडा शिकवा म्हणजे काय याचा विचार राज्यकर्त्यांस करावा लागेल. विद्यमान सरकार सत्तेवर येण्याआधी त्या राज्याकडे आधीच्या सत्ताधाऱ्यांचे दुर्लक्ष झाले आणि इस्लामी लांगूलचालनाच्या राजकीय हिशेबामुळे ते सत्ताधीश या राज्यात बरे काही करू शकले नाहीत हे मान्य करून २०१४ नंतरच्या दहशतवादी हल्ल्यांचा आढावा या प्रसंगी घेतल्यास काय दिसते? पठाणकोट (२ जानेवारी २०१६) आणि त्याच वर्षी उरी (१८ सप्टेंबर २०१६) येथे थेट लष्करी तळावरही हल्ला, बारामुल्ला (३ ऑक्टोबर २०१६), पुढच्याच वर्षी अमरनाथ यात्रेवरील हल्ला (११ जुलै २०१७), पुलवामा (१४ फेब्रुवारी २०१९) आणि आता पहलगाम असा हा घटनाक्रम. यात चीनने लडाखमध्ये केलेल्या आगळिकीचा उल्लेख नाही. म्हणजे केवळ जम्मू-काश्मीर आणि इस्लामी दहशतवाद्यांचे हल्ले मधल्या काळात घटले असे म्हणता येईल? या महत्त्वाच्या घटनांव्यतिरिक्त छोटेमोठे हल्ले सुरूच आहेत. यातील उरी वा पुलवामा हल्ल्यांनंतर आपण अनेकांची आजही इच्छा आहे तसा 'मूंहतोड जबाब' दिला. पण त्यातून ना इस्लामी दहशतवादी बधले; ना पाकिस्तान 'घरमें घुसके मारेंगे' ऐकून शांत झाला! याच काळात जम्मू-काश्मीरचे 'अनुच्छेद ३७०'चे 'जुने दुखणे' या सरकारने बरे केले आणि तेथे विधानसभा निवडणुकाही घेतल्या. या निवडणुकांआधी स्थानिकांस विचारात न घेता त्या राज्यापासून लेह-लडाख वेगळे केले गेले आणि उर्वरित जम्मू-काश्मीरचा पूर्ण राज्याचा दर्जाही गेला. आज त्या राज्यास मुख्यमंत्री आहे, पण सर्वाधिकार आहेत नायब राज्यपालांहाती. तरीही हे सर्व जम्मू-काश्मिरी जनतेने गोड मानून घेतले आणि स्थानिक माणसे आपले विस्कटलेले आयुष्य पुन्हा रुळावर आणण्याच्या प्रयत्नास लागली. आणि आता हे पहलगाम घडले. ते पाकिस्तानी लष्कराच्या सक्रिय सहभागाशिवाय होणे अशक्य. त्यातही विद्यमान लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी अलीकडेच जम्मू-काश्मीरसंदर्भात अत्यंत आक्षेपार्ह आणि भडकाऊ वक्तव्य केले याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. त्यास पार्श्वभूमी होती ती बलुचिस्तानात 'जाफर एक्स्प्रेस' रेल्वेवर झालेला दहशतवादी हल्ला. त्यामागे भारताचा हात असल्याचा संशय त्या देशात काहींनी व्यक्त केला. सत्ताधीशांतील कोणी तसे अधिकृतपणे बोलले नसले तरी स्थानिक माध्यमांत त्याची चर्चा झाली. पाकिस्तान आपल्याविरोधात जम्मू-काश्मिरात जे करतो त्यावर जशास तसे उत्तर म्हणून बलुचिस्तानात आपणही 'काही' करावे अशी इच्छा बाळगणारा एक मोठा वर्ग आपल्याकडे आहे. आपल्या देशातील फुटीरतावाद्यांस पाकिस्तान उत्तेजन देत असेल तर त्या देशातील अस्वस्थ फुटीरतावाद्यांना आपण रसद द्यावी असा हा विचार. त्यात गैर काही नाही. तथापि बलुचिस्तानातील ताजा रेल्वे हल्ला, त्यानंतर पाक लष्करप्रमुख मुनीर यांचे वक्तव्य आणि हा पहलगाम हल्ला या तीन घटना एकत्र पाहिल्यास त्यांचा एकमेकींशी संबंध नाही असे म्हणता येणे अवघड. विशेषतः ज्या तयारीने पहलगामची निवड दहशतवाद्यांनी केली त्यावरून तर त्यामागील पाक हात स्पष्ट दिसतो. भले मोठे पठारीमैदान, तेथे जाण्यासाठी पायी वा तट्टू इतकेच दोन पर्याय असणे हे केवळ दहशतवाद्यांस सुचणारे नाही. त्यामागे निश्चित लष्करी तरबेजपणा आहे. इतकेच नाही तर आपले पंतप्रधान सर्वात प्रबळ सुन्नी मुसलमान सत्ताधीशांच्या समवेत सौदी अरेबियात असणे आणि अमेरिकेचे उपाध्यक्ष जे. डी. व्हान्स हे भारतात असताना हे हल्ले होणे हे काही केवळ योगायोग असू शकत नाहीत. याचा अर्थ लष्करी उपायांच्या बरोबरीने अन्य बुद्धिमान पर्यायांचाही विचार आपणास करावा लागेल. त्यासाठी सत्ताधाऱ्यांनी सर्व राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून सहमती तयार करण्याचे औदार्य दाखवता आल्यास पाहावे. पूर्वीच्या राजवटीत अशा उत्पातानंतर त्या वेळच्या विरोधकांनी त्या वेळच्या सत्ताधीशांचे राजीनामे मागितले हे खरे असले तरी आताच्या विरोधकांनी मात्र एवढ्या भयंकर संकटसमयी पक्षीय राजकारण करण्याचा कोतेपणा दाखवू नये. या कठीण प्रसंगी सरकारच्या मागे उभे राहणे गरजेचे आहे आणि तसे करण्यात मनाचा मोठेपणाही आहे. विरोधकांनी तो दाखवावा. पहलगाममध्ये जे झाले त्यास (आणखी एक) लक्ष्यभेदी हल्ला (सर्जिकल स्ट्राइक) हेच योग्य प्रत्युत्तर असे छातीठोकपणे काही वृत्तवाहिनीवीर वीररसपूर्ण सुरात सांगू लागले आहेतच. त्यांचे भाकीत सरकार खरे ठरवणार का, हे पाहायचे.

पान १ वरून

## काश्मिरात अडकलेल्यांपैकी...

७ पर्यटक पर्यटनासाठी जम्मू-काश्मीरमध्ये गेले असल्याची माहिती संकलित करण्यात आली होती.

या पर्यटकांना सुखरूप सोलापुरात आणण्यासाठी जिल्हा प्रशासनाने शासनाच्यावतीने समन्वय व संपर्क ठेवून पर्यटकांची व्यवस्था केली आहे. काहीजण खासगी विमानाने, शासनाच्या विमानाने महाराष्ट्रात येत आहेत. येत्या दोन दिवसात जिल्ह्यातील सर्व भाविक सुखरूप सोलापूर जिल्ह्यात येतील, अशी माहितीही जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांनी दिली.

### वात्रटिका

**विमान प्रवास**

त्यांच्या मोठेपणाचे
कौतुक केले पाहिजे...
विमानात बसवले म्हणून
आभार मानले पाहिजे...
केवळ तुमच्या मुळेच
बिचाऱ्यांना विमान कळाले...
उपकार केले तुम्ही म्हणून
विमानात बसायला मिळाले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

# वा बिरदेव वा...

"तुम्ही गरिबीत जन्माला आला हा तुमचा दोष नाही, परंतु तुम्ही गरिबीतच मेलात तर हा तुमचा दोष ठरेल! " या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कोट उद्धृत करत आपली पहिली प्रतिक्रिया देणारा बिरुदेव सिद्धाप्पा डोणे हा साधा मेंढपाळाचा मुलगा आयपीएस अधिकारी झाला आहे. आता त्याची 'गरिबी हटली' यापेक्षाही महत्त्वाचं म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्याच शब्दात सांगायचं झालं, तर आज तो 'शासनकर्ता' बनला आहे. भारतीय पोलीस सेवेमध्ये (IPS) तो प्रथम दर्जाचा अधिकारी झाला आहे. अफाट कष्ट, त्याग, समर्पण आणि चिकाटी याच्या जोरावर भारतीय प्रशासकीय सेवेचा अर्थातच 'स्टील फ्रेमचा ' तू भाग बनला आहे.



नुकताच UPSC परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये यमगे ता. कागल, जि. कोल्हापूर या गावातील बिरदेव सिद्धाप्पा डोणे यानी यूपीएससी मध्ये ५५१ वी रँक प्राप्त केली आहे.ज्या दिवशी UPSC चा निकाल लागला त्या दिवशी बिरदेव हा वडील आजारी असल्याने स्वतः मेंढया चारत होता. मेंढया चारत असतांना त्याला IPS झाल्याच्या कॉल आला अन बिरुदेवच्या डोळ्यातून आनंदाअश्रूच्या धारा लागल्या.' शिक्षण हे समाज परिवर्तनाचे मुख्य साधन आहे.' हे अनेक शिक्षण तज्ञांनी सांगितलं आहे . मन,मेंदू आणि मनगट मजबूत करण्याचं काम शिक्षण करत. स्वप्न पाहण्यास आणि ते सत्यात उतरवण्यास शिक्षण मदत करतं. "विद्यार्थ्याला स्वतःची लायकी समजत असते." या शब्दात बिरुदेव आपली प्रतिक्रिया देतो,तेव्हा बिरदेवने स्वतःची पात्रता फार पूर्वीच ओळखली होती. पुढे तो त्या मार्गाने चालत गेला; आणि यशस्वी झाला. परीक्षा कालावधीमध्ये आणि परीक्षेची तयारी करत असताना आपल्या मावशीच्या आणि आजोबांच्या अंत्यसंस्काराला सुद्धा येता आलं नाही याचं दुःख बिरदेवला होतं. पण ' sacrifices makes you stronger' असं त्याचं यावर मत होतं. त्याला वडिलांच्या ऑपरेशन मुळ यूपीएससीची मुख्य परीक्षा पास होऊन मुलाखत देण्यास फक्त एक महिना तयारीसाठी मिळाला. यावर तो म्हणतो ,'कमी वेळेत सर्वोत्तम तयारी होत असते!' अनेक कारणं सांगून अभ्यासाची टाळाटाळ करणाऱ्या विद्यार्थ्यांना बिरूदेवचा हा सल्ला लाख मोलाचा आहे. आपण ज्या माणसातून, मातीतून आणि पशु-पक्षातून येतो त्याच्याशी आपली नाळ तुटू न देण्याचा; आणि आपलं मूळ स्वरूप न कचरता प्रकट करण्याची वृत्तीच बिरूदेवला या परीक्षेत यशस्वी करण्यात उपयोगी पडली. इंग्रजी कच्च असतानाही भाषा ही अडचण न ठरता प्रयत्नांतून तिच्यावर प्रभुत्व मिळवून बिरदेवने यशाला गवसणी घातली आहे.


बिरदेव डोणे याचं बालपण डोंगरदऱ्यांमध्ये मेंढ्या चारत, कधी उघड्यावर अभ्यास करत करत शिकण्यात गेलं. मेंढ्या पाळण्यात आणि त्यांचा सांभाळ करण्यात देखील मोठी आव्हानं आहेत आणि त्यापेक्षा मोठं काहीकरी केलं पाहिजे, यासाठी त्याने मेहनत घेतली. गावातील शाळेत प्राथमिक, माध्यमिक शिक्षण पूर्ण केलं. अभ्यास करायला जागा नसल्याने गावातील मराठी शाळेच्या व्हरांड्यात तो अभ्यास करायचा. पुढे अभियांत्रिकीची पदवी घेऊन बिरूदेवने दोन वर्षे दिल्ली मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेच्या परीक्षेचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यानंतर तो पुण्यात आला. त्याने दोन वेळा यूपीएससीची परीक्षा दिली, पण त्याला यशाने हुलकावणी दिली. जिद्दीने त्याने मागील वर्षी पुन्हा परीक्षा दिली आणि यामध्ये उज्वल यश मिळवत देशात ५५१ वी रँक मिळवला.

स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्यांच्या तीन 'कॅटेगरी' असतात.स्वयंघोषित, जनता घोषित, आणि आयोग घोषित. पहिल्या दोन कॅटेगरीतून तिसऱ्या कॅटेगरीत हजारातील एखादाच पोहोचतो. आणि 'सायेब' होतो. बिरुदेव आज तिसऱ्या कॅटेगरीत गणला जात आहे. पण आज महाराष्ट्रात अनेक तरुण स्वयंघोषित आणि जनता घोषित या कॅटेगरीत राहून स्पर्धा परीक्षांची तयारी करत आहेत. बिरदेव ने सांगितल्याप्रमाणे आपली लायकी त्यांनी लवकरच ओळखून पर्यायी मार्ग निवडणं आवश्यक आहे. आपल्या उमेदीचा काळ किती ताणून धरायचा हे स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या तरुणांनी ठरवले पाहिजे. प्रशासकीय अधिकारी या व्यतिरिक्त समाज जीवनात अनेक क्षेत्रे आहेत जी आपल्या व्यक्तिमत्वास न्याय देऊ शकतात तीही तरुणांनी ओळखली पाहिजेत. कायद्याचं राज्य हा समाज व्यवस्थेचा पाया आहे. या कायद्याच्या राज्याचे रक्षण करण्यासाठी समाज काही लोकांच्या हाती ताडनाची शक्ती देतो. ती व्यवस्था म्हणजे पोलीस. या व्यवस्थेच्या उच्च पदावर आज बिरदेव आपल्या अथक प्रयत्नातून पोचला आहे. सामान्य, दीनदलित, भटक्या आणि शोषित, वंचित समाज घटकाचे दुःख त्यांनी फार जवळून पाहिलं आहे. अशा घटकांना न्याय देण्याचे काम बिरुदेव आपल्या सेवाकाळात नक्कीच करेल. पोस्ट मिळाली की पदाचं तेज येतं, रुबाब वाढतो, माणूस उभा आडवा वाढतो. पण बिरूदेव सारखे सामान्य घरातून आलेले तरुण याला अपवाद ठरतात. आपली भाषा, जगण्याची पद्धती, साधा सरळ मोकळा-ढोकळा ग्रामीण बाज जपत बिरुदेव पुढील काळात सामान्यांना आपलासा वाटेल यात शंका नाही.

वक्त हर लम्हा
हमसे ये कहता हुआ गुजरा,
साथ चलना है तो चल
वरना मै तो गुजर जाऊंगा!

कालचक्र कोणासाठीही थांबत नसतं. आजची वेळ, तारीख, दिवस विश्वाच्या अंतापर्यंत परत कधी येणार नसते. म्हणून 'उद्या' जिंकण्यासाठी आज सिद्ध व्हा! हा संदेशच बिरूदेव ने आपल्या यशातून नवतरुणांना दिला आहे. बिकट परिस्थिती, प्रतिकूल व्यवस्था, साहित्यांचा अभाव याच रडगाणं गात बसणाऱ्यांनी एक वेळ बिरूदेव ला भेटून अथवा त्याची मुलाखत पाहून खडतर मार्गावरून जाण्यास सिद्ध व्हावं. शेवटी, आपल्या मनातील निर्धार हाच यशाकडे घेऊन जात असतो.
मन में है विश्वास, पूरा है विश्वास
हम होंगे कामयाब एक दिन...

हा तर खरा बिरुदेव डोणे याच्या यशाचा खरा मंत्र आहे. आज संपूर्ण महाराष्ट्र सोशल मीडिया वरून व्यक्त होत असताना म्हणत आहे, " वा बिरूदेव वा..."



**किशोर जाधव,** सोलापूर
– मो. नं. ९९२२८८२५४१

## प्रबोधन

# सुट्टीत शिकाव्या । कला जीवनाच्या

जपानमध्ये सुट्टी हा शब्द उपेक्षित आहे, असं म्हणतात. त्याउलट भारतात मात्र हा शब्द फार फार आवडतो, अपेक्षित असतो. कारण आपण सुट्ट्यांवर मनापासून प्रेम करणारे आहोत. आपला हा सुट्टीबाज स्वभाव दूर करण्यासाठीच का गीतेमधून कृष्णासारख्या सामाजिक धन्वंतरीमार्फत कर्मयोगाचे डोसही दिले आहेत?

अर्थात, जे वर्षभर सातत्य राखून काम करतात त्यांनी सुट्टी घेतलीही पाहिजे आणि पुढील कामासाठी तयारही राहिले पाहिजे. एरवी ज्या गोष्टी करायच्या राहून गेल्यात, त्या सुट्टीत आवर्जून करायला काय हरकत आहे? सुट्टीत घराच्या सफाईचं काम करता येतं. बागकाम पूर्वीपेक्षा अधिक सुंदर करता येतं. नित्य वापरातल्या गाड्यांची देखभाल करता येते. पुस्तकुप्रदर्शनाला भेट देता येते. आपल्या शिक्षक-मार्गदर्शकांच्या भेटीगाठी घेता येतात. चित्रकलेचा अभ्यास करता येतो. आपल्या वर्गमित्रांचा स्नेहमेळावा भरवता येतो. कचेऱ्यांमध्ये रखडलेल्या कामांना दिशा लावता येते. आपल्या कुटुंबियांच्या आरोग्याची स्थिती कशी आहे आणि कशी असली पाहिजे, इकडे लक्ष देता येतं. घरचं ग्रंथालय वाढवता येतं. जुन्या पुस्तकांचं रक्षण करता येतं.

घरी शिकणारी मुलं असतील, तर त्यांच्या पुढील शिक्षणाची तयारी करण्यासाठी सुट्टी ही सुवर्णसंधीच असते. चौथी – सातवीमध्ये गेलेल्या आपल्या पाल्यांना शिष्यवृत्ती परीक्षेची तयारी करण्यासाठी सर्व तऱ्हेचे प्रयत्न करून त्यांना मार्गी लावावं, ते या सुट्टीतच ! पालकांनी दहावी- बारावीत गेलेल्या पाल्यांच्या पूरक अभ्यासासाठी कोणते वर्ग दजेर्दार आहेत, हे शोधून काढण्याचं जिकिरीचं काम झटून केलं, तर हे पाल्य आपल्या पालकांचं नाव नक्कीच उजळ करतील. शिकवणी हा धंदा आहे. काही क्लासवाले दर्जा सांभाळतात; तसेच आपल्या पाल्यांच्या प्रगतीची हमी देतात. अशा ठिकाणी फी थोडी अधिक असते. ती भरणं आणि आपल्या पाल्याला क्लासेसच्या शिस्तीत बसवण्यासाठी झटणं हे पालकांचंच काम आहे आणि त्याचसाठी सुट्ट्यांचा हंगाम साधला गेला पाहिजे. मुलांना अभ्यासाचं वळण लावण्यासाठी पालकांनी त्यांच्याबरोबर बसण्याची तपश्चर्या या सुट्टीतच करायची असते.

अभ्यासातून विद्यार्थ्यांची प्रगती होते, ही गोष्ट शंभर टक्के खरी आहे. पण काही चोखंदळ पालक मुलांना नृत्य, नाट्य, संगीत, क्रीडा, लेखन किंवा टी.व्ही.च्या विविध चाचणी परीक्षा (Auditions) या क्षेत्राकडे वळवतात. गुणवंत विद्यार्थ्यांचं त्यामुळे नुकसान होतं. जीवनाचा पाया शैक्षणिक क्षेत्रातील गुणवत्तेमुळे अधिक भक्कम होतो, हे पालकांनी लक्षात घ्यावं. अभ्यासेतर उपक्रम हे सामान्य बुद्धीच्या विद्यार्थ्यांसाठी असतात. कुस्ती, तिरंदाजी, बॉक्सिंगसाठी उच्च स्मरणशक्ती, उत्कृष्ट शब्दयोजना यांची गरज नसते. म्हणून पालकांनी आपल्या पाल्याच्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक कुवतीनुसार योग्य क्षेत्र निवडावं आणि सुट्टीत त्या अभ्यासाचा प्रारंभ करावा.

सुट्ट्यांमुळे मन, उल्हसित व्हावं, हे सूत्र महत्त्वाचं आहे. शीण, कंटाळा, थकवा, त्रास उत्पन्न होणं, हे सुट्ट्यांच्या दुरुपयोगाचं लक्षण आहे. प्राणहानी किंवा अपंगत्व येणं हा तर सुट्ट्यांचा निषेधच आहे. जंगलातील भटकंती, उन्हाळी कँप, गिर्यारोहण, सर्प मैत्रीचा छंद. क्रॉस कंट्रीतील सहभाग, अतिरेकी साहसीपणा हे उद्योग काही वाह्यात तरुण-तरुणींना सुचतात आणि त्यांना अडचणीतही आणतात. सुट्टी म्हणजे जीवनाशी खेळणं नव्हे. सुट्ट्यांचा हंगाम साधून आध्यात्मिकतेच्या पिंजऱ्यात नव्या पिढीला अडकवण्याचे धूर्त खेळही काही संघटना आपल्या प्याद्यांमार्फत खेळत असतात. ब्रह्मविद्या आणि प्राणायाम अशा उपद्व्यापातून भाविकतेचे रोगजंतू नव्या पिढीत संक्रमित केले जातात. नवा भारत वेदकालीन भारत कसा होईल, वर्णाश्रमधमार्चं पुनरुज्जीवन कसं करता येईल. हाच घृणास्पद खटाटोप अविरतपणे आपल्या देशात सुरू आहे. जागृत पालक आपल्या पाल्याचं रक्षण करून त्याला नव्या, आधुनिक भारताच्या, लोकशाहीनिष्ठ नागरिकत्वाच्या दिशेने नेईल. असे पालक तीर्थक्षेत्रांना भेटी न देता ऐतिहासिक स्थळं, उद्योगकेंद्र, संशोधन संस्था, प्रागतिक शिक्षण केंद्र यांच्या अभ्यासपूर्ण सहली आयोजित करतील.

सुट्ट्या म्हणजे रिकामटेकडेपणा नव्हे. निष्क्रियताही नव्हे आणि सुस्तावणंही नव्हे. इंधन भरण्यासाठी वाहनं थांबतात खरी, पण ती इंधन भरून मोठा पल्ला पार करायचा आहे, म्हणून. सुट्ट्या हा इंधन पुरवणारा क्षणभरचा थांबा आहे. सुट्ट्यांचा हा अर्थ ज्यांच्या लक्षात आला, त्यांच्या सुट्ट्या निश्चित सार्थकी लागतात. कारण-

सुस्तावणे नव्हे । मस्तावणे नव्हे ।
सुट्ट्या म्हणजे नव्हे । कालापव्यय ॥ १
सुट्टीचे उद्दिष्ट । शक्तीचा संचय ।
झेपावणे ध्येय । सिद्धीसाठी ॥२
नियोजितपणा । सुट्टीसाठी हवा ।
व्यर्थचि ना जावा । क्षण एक ॥३
तीर्थयात्रा, जत्रा । सत्संग, उरूस ।
जीवनाचा नाश । खरोखरी ॥४
सुट्टीत शिका । कला जीवनाच्या ।
शिकाव्या युक्तीच्या । गोष्टी चार ॥५
यावी सुट्टीमुळे । जीवनाला गती ।
साधावी प्रगती। सुट्टीमुळे ॥६



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सर्वांगीण निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध - उपमुख्यमंत्री अजित पवार

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** निरोगी नागरिक हाच राज्याच्या प्रगतीचा पाया असून, आरोग्य सेवेचा दर्जा सुधारण्यासोबतच सर्वांगीण निरोगी महाराष्ट्र घडविण्यासाठी राज्यशासन कटिबद्ध असून याकरीता सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी दिली.



कुटुंब कल्याण भवन येथे आयोजित राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्र इमारत भूमिपूजन आणि हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना अंतर्गत राज्यातील नवीन ४३ आपला दवाखान्यांच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, राज्याचे आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे व्यवस्थापकीय संचालक अमगोथू श्री रंगा नायक, आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी आदी उपस्थित होते.

राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्र इमारत आणि नवीन ४३ आपला दवाखान्यांच्या माध्यमातून नव्याने भर पडणाऱ्या आरोग्य सुविधांमुळे राज्यातील आरोग्य सेवा अधिक बळकट, सक्षम आणि गतिमान होईल, असे सांगून उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात वेळेत उपचार न मिळाल्यामुळे एका गरोदर महिलेला जीव गमवावा लागल्याच्या प्रकरणात चौकशी होऊन दोषींवर निश्चित कठोर कारवाई केली जाईल. अशा घटना पुन्हा घडू नये, अशी प्रणाली आणि कठोर नियम सर्व रुग्णालयांना लागू करण्यासाठी राज्य शासन एक नवे धोरण लवकरच राज्यात लागू करणार आहे. या धोरणानुसार कोणतेही रुग्णालय नागरिकाला अत्यावश्यक आरोग्य सेवेपासून वंचित ठेवणार नाही. गरजू नागरिकांना वैद्यकीय मदत मिळालीच पाहिजे, अशी राज्य शासनाची भूमिका असून लवकरच राज्यात रुग्णालयांसाठी ह्यनो डिनायल पॉलिसीह्ण लागू करणार आहे. राज्य शासन रुग्णालयांना जागेसह सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देते.

जागतिक हिवताप दिनानिमित्त चांगले काम करण्याच्या वैद्यकीय क्षेत्रातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देऊन उपमुख्यमंत्री पवार म्हणाले, अधिकारी, कर्मचाऱ्यासह नागरिकांनी नियमित व्यायाम केला पाहिजे. संतुलित आहार घेतला पाहिजे. आपले मानसिक आरोग्य चांगले राखून निरोगी नागरिक हाच राज्याच्या प्रगतीचा पाया आहे या विचाराने सर्वांनी काम करावे, नागरिकांना दजेर्दार आरोग्य सेवा दिली पाहिजे. असेही उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले की, आरोग्य सेवा पुरविण्यासाठी पुणे हे राज्यातील दुसरे सर्वात महत्त्वाचे ठिकाण आहे. पुण्यात आरोग्य विभागाची अनेक राज्यस्तरीय कार्यालये आहेत. राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीमुळे आरोग्य विभागाची एकाच छताखाली येणार आहेत. यामुळे आरोग्य विभागाची सर्व कार्यालये एकाच ठिकाणी आल्यानंतर प्रशासकीय कामांमध्ये गतिमानता आणि दजेर्दार पायाभूत सुविधा आणि आरोग्य सुविधा देण्यास मदत होणार आहे.

अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज या इमारतीमध्ये प्रशिक्षण हॉल, व्हिडिओ कॉन्फरन्स हॉल, अभिलेख कक्ष, वाहनतळ, आदी पायाभूत सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे, या इमारतीचे काम नियोजित वेळेत पूर्ण करावे. आज लोकार्पण करण्यात आलेल्या नवीन आपला दवाखान्यांपैकी पुणे शहरात सात दवाखाने आहेत. या दवाखान्यांच्या माध्यमातून शहरी भागात झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या गरीब नागरिकांना अधिक गतिमान आणि दजेर्दार आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, असे मंत्री आबिटकर म्हणाले.

विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, सार्वजनिक आरोग्य विभागाचे काम समाजाच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. आरोग्य विभागाने आतापर्यंत विविध महत्त्वाच्या मोहिमा यशस्वीरित्या पार पाडल्या आहेत. ग्रामीण आणि दुर्गम भागातही आपल्या सेवा पुरविल्या आहेत. या पुढील काळातही आरोग्य विभाग चांगली कामगिरी करून लोकांना दजेर्दार आरोग्य सेवा पुरवेल, असा विश्वास डॉ. गोऱ्हे यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या निष्पाप नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली. कार्यक्रमानंतर जागतिक हिवताप दिनानिमित्त काढण्यात आलेल्या रॅलीला हिरवा झेंडा दाखवून आरोग्य मंत्री आबिटकर त्यात सहभागी झाले.

# 'वेव्हज २०२५' : माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राच्या जागतिक परिवर्तनाचा प्रारंभ

देशातील माध्यम व मनोरंजन (Media & Entertainment) क्षेत्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण ठरणाऱ्या 'WAVES 2025' या जागतिक परिषदेस मुंबईत भव्य सुरुवात होत आहे. १ मे रोजी, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते जिओ वर्ल्ड सेंटर, मुंबई येथे या ऐतिहासिक परिषदेचे उद्घाटन होणार आहे. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार आहेत.

१ ते ४ मे दरम्यान होणारी ही परिषद भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालय आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली असून, माध्यम आणि मनोरंजन उद्योगाच्या भविष्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

**महाराष्ट्र – 'ग्लोबल क्रिएटर इकॉनॉमी'कडे वाटचाल**

बॉलीवूड, टीव्ही आणि ओटीटी इंडस्ट्री यांचे केंद्रस्थान असलेली मुंबई भारताच्या मनोरंजन क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. आता याच मुंबईला आणि महाराष्ट्राला जागतिक स्तरावर 'क्रिएटर हब' म्हणून प्रतिष्ठा मिळवून देण्याचा महत्त्वाकांक्षी प्रयत्न 'WAVES 2025' च्या माध्यमातून होतो आहे. ऑस्कर, कान्स आणि दावोससारख्या जागतिक परिषदेच्या धर्तीवर प्रथमच भारतात अशी परिषद आयोजित होत असून, जगभरातील 100 पेक्षा अधिक देशांतील प्रतिनिधी यात सहभागी होणार आहेत.

**माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राला दिशा देणारा मंच**

'WAVES 2025' ही परिषद केवळ भारतातीलच नव्हे तर जागतिक माध्यम व मनोरंजन (M&E) उद्योगाला एकत्र आणणारा, नवसृजनास चालना देणारा आणि गुंतवणुकीसाठी दरवाजे उघडणारा एक महत्त्वाचा मंच आहे. भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, तंत्रज्ञानातील कौशल्य आणि प्रतिभेचा संगम या परिषदेच्या केंद्रस्थानी असणार आहे.

**या परिषदेतील एक विशेष आकर्षण 'WAVES बाजार'**

'WAVES बाजार' – एक इंटरॅक्टिव्ह व्यावसायिक व्यासपीठ असून जिथे खरेदीदार आणि विक्रेते थेट संवाद साधू शकतात. नव्या प्रकल्पांची ओळख, सर्जनशील कल्पना, आणि गुंतवणुकीच्या संधी येथे उपलब्ध होतील. विशेषतः, श्रेणीआधारित शोध प्रणाली आणि सुरक्षित मेसेजिंग सुविधांमुळे व्यवहार अधिक प्रभावी आणि विश्वासार्ह ठरतील.

**परिषदेत काय असणार?**

१. परिषद सत्रे – जागतिक उद्योग नेते, विचारवंत आणि नवोन्मेषक विविध विषयांवर मार्गदर्शन करतील.

२. मीडिया मार्केटप्लेस – भारताच्या माध्यम व मनोरंजन (M&E) क्षेत्रातील वैविध्य, क्षमता आणि नवकल्पनांचे आकर्षक प्रदर्शन.

३. तंत्रज्ञान प्रदर्शन – नवीन तंत्रज्ञान आणि सर्जनशील प्रकल्पांचे लाईव्ह डेमो.

४. सांस्कृतिक कार्यक्रम – भारताच्या समृद्ध कलासंपदेची झलक दाखवणारे बहारदार कार्यक्रम.

**'WAVES 2025' : उद्योगाला बळकटी देणारी संजीवनी'**

माध्यम आणि मनोरंजन उद्योग सध्या मोठ्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर आहे. 'WAVES 2025' ही परिषद नव्या कल्पनांना दिशा देऊन, भारताला जागतिक M&E सुपरपॉवर बनवण्याचा पाया रचणार आहे. सर्जनशीलता, तंत्रज्ञान आणि धोरणात्मक भागीदारी यांचा मेळ घालून, भारताला 'ग्लोबल कंटेंट डेस्टिनेशन' बनवण्याचे स्वप्न या मंचाद्वारे प्रत्यक्षात उतरणार आहे. पंतप्रधान, केंद्रीय मंत्री आणि राज्याचे मुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत होणारी ही परिषद भारताच्या सृजनशील भविष्यासाठी नवी ऊर्जा आणि प्रेरणा देणारी ठरणार आहे.

**वर्षा फडके-आंधळे,**
उपसंचालक (वृत्त)

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना जिल्हयात शासकीय जमिनीचे वाटप

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना 2.0 अन्वये महावितरण कंपनीस शासकीय जमिनी ह्या 30 वर्षाच्या भाडेपट्टयाने देण्यात आलेले आहेत. ह्या योजनेच्या अनुषंगाने असे निदर्शनास येत आहे की, स्थानिक पातळीवर महावितरण कंपनीस व अंतर्गत एजन्सी यांना काम करताना स्थानिक लोक, ग्रामस्थ, स्थानिक पत्रकार, सोशल मिडीया पत्रकार काम करण्यास अडथळा निर्माण करीत असलेचे महावितरण कंपनी व संबंधित एजन्सीकडून माहिती प्राप्त झाली आहे.

तसेच काही ग्रामस्थांनी ग्रामपंचायत / ग्रामसभा ठराव दिलेला नसलेने प्रकल्प उभा करणेत येऊ नये, अशा प्रकारची मागणी करीत आहेत. विशेषतः माढा (माळेगाव, भेड, वडोली), सांगोला (कटफळ), बार्शी (सजार्पूर, झाडी), अक्कलकोट (बादलकोट) येथील ग्रामस्थांचा सदर प्रकल्पास विरोध करीत असलेबाबत अतिरिक्त कार्यकारी अभियंता, (स्था.) स्थापत्य विभाग, सोलापूर यांनी बैठकीमध्ये नमूद केले आहे.

तथापि, सदर प्रकल्प मा. मुख्यमंत्री महोदय यांचा (फ्लॅगशिप) प्रथम प्राधान्याचा विषय असलेने स्थानिक ग्रामस्थांकडून विरोध होत असल्यास प्रथम लोकांना / ग्रामस्थांना याबाबतचे पर्यावरणीय फायदे, क्रॉस सबसिडीचा पडणारा भार, आणि विशेषतः शेतक-यांनाच फायदा होणार आहे. आणि प्रकल्प उभारल्यानंतर दरवर्षी अनूदान उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच शासनाचे महत्वाचे फ्लॅगशिप योजना असलेने पूर्ण करणेबाबत सुचना दिलेले आहेत.

तरी सर्व ग्रामस्थ / स्थानिक पत्रकार / सोशल मिडीया पत्रकार यांना कळविणेत येते की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत महावितरण यांना शासकीय जमीन वाटप करणेत आलेनुसार कोणीही प्रकल्पास विरोध /अडथळा करु नये, अन्यथा यांची गंभीर दखल घेण्यात येईल. तसेच कोणीही कायदा व सुव्यवस्था हातात घेवू नये. जर प्रकल्पाबाबत काही विचारणा करावयाची असल्यास तालुका स्तरावरील तहसिलदार / उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी कार्यालयास व महावितरण कार्यालयास विचारणा करावी. प्रकल्पाचे काम करणा-या यंत्रणेस अडचण निर्माण करु नये. अन्यथा यांची गंभीर दखल घेण्यात येईल. असे आवाहन करण्यात येत आहे.


मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेच्या प्रकल्पास विरोध अडथळा निर्माण केल्यास अथवा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केल्यास संबंधितावर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. असे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

# रामभाऊ सातपुते यांचे शिवप्रसाद अर्बनला सदिच्छा भेट



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील शिवप्रसाद वुमन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीस माळशिरस तालुक्याचे मा. आमदार रामभाऊ सातपुते यांनी सदिच्छा भेट दिली. या भेटीदरम्यान शिवप्रसाद समूहाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक स्वागत करून सोसायटीचे सेक्रेटरी सुशांत पाटील यांच्या शुभहस्ते मा. आमदार रामभाऊ सातपुते यांचा सन्मान करण्यात आला यावेळी बादल सोरटे, रवींद्र पताळे, सूरज गणगे तसेच शिवप्रसाद अर्बनचे कर्मचारी उपस्थित होते.

# अकलूज येथे 12 मे रोजी मराठा वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन



**अकलूज, (कटूसत्य वृत्त):-** संघर्ष योद्धा न्यूज पोर्टल आयोजित मराठा वधु-वर सूचक केंद्र यांच्या वतीने महाराष्ट्र राज्यातील मराठा समाजातील विवाहच्छूक वधु-वरांसाठी अकलूज ता.माळशिरस येथे 12मे रोजी शहरातील आनंदमूर्ती मंगल कार्यालय, अकलूज-माळीनगर रोड, छत्रपती संभाजीनगर, पंचवटी स्टॉप अकलूज ता.माळशिरस जि.सोलापूर, येथे वधू-वर महामेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, इच्छुक वधु-वरांनी मोठ्या संख्येने आपली नाव नोंदणी करून हा मेळावा यशस्वी करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या मेळाव्यात अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

मराठा समाजातील अनेक तरुण-तरुणी इच्छित स्थळ मिळत नसल्याने अविवाहित आहेत. वराची किंवा वधूची माहिती घेऊन त्यांना मनपसंत जोडीदार मिळवून देण्यासाठी ना नफा ना तोटा तत्त्वावर या मेळाव्यातून प्रयत्न केला जाणार आहे. या मेळाव्यात सहभागी झाल्याने श्रम, वेळ, पैसे, वाचणार आहेत.

या मेळाव्यात महाराष्ट्र राज्यातील आयटी,पदवीधर, इंजिनियर, डॉक्टर, व्यावसायिक, शिक्षक, शेतकरी, याशिवाय इतर विविध क्षेत्रातील उच्च शिक्षिय, अल्प शिक्षित वधू वर, याशिवाय घटस्फोतीत वधू वर मोठया संख्येने उपस्थित राहणार आहेत.

त्याचे पहिले पाऊल सोलापूर जिल्ह्यात या वधूवर महामेळाव्याने उचलले आहे.

अनेक पालकांनी वधूवर मेळावा घेण्याची विनंती केल्याने समाजाच्या आग्रहाखातर या मेळाव्याचे आयोजन केले आहे.याशिवाय मराठा वधू वर सूचक केंद्र या व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून देखील हे कार्य सुरु आहे. मेळाव्यात सहभागी होऊन, आपण आपल्या गरजा आणि अपेक्षा स्पष्ट करू शकतो.याशिवाय उपस्थित असलेल्या इतर लोकांकडून आपण जोडी निवडण्याबद्दल चर्चा करू शकतो. आणि योग्य निर्णय घेऊ शकतो.वधू-वर परिचय मेळावे हे विवाह इच्छुक व्यक्तींसाठी एक चांगला पर्याय आहे, जो त्यांना योग्य जोडी निवडण्यास मदत करतो. ज्यामुळे संस्कृतीचा आदर होतोआणि समाजाला एकत्र आणण्यास मदत करते.

इच्छुक वधू-वर किंवा त्यांच्या पालकांनी या वधूवर मेळाव्यात सक्रिय सहभाग घेऊन विवाहच्छूक वधु-वरांची नावनोंदणी करावी. तसेच गैरसोय टाळण्यासाठी मेळाव्याला येण्यापूर्वी संपर्क साधावा.

अधीक माहिती व नाव नोंदणी साठी संपर्क गणेश जाधव (7841847458.)रणजितदादा गायकवाड (7028873111).अमर जाधव (9890565151),अभिजित बाबर (7507655055.)

# सहकार महर्षि कारखान्यामध्ये हंगाम २०२५-२६ करीता ऊस तोडणी वाहतूक कराराचा शुभारंभ

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्यामध्ये गळीत हंगाम २०२५-२६ करीता बैलगाडी, बजाट, ट्रक, ट्रॅक्टर व ऊस तोडणी यंत्र यांचे तोडणी वाहतूक करारांचा शुभारंभ कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते कारखाना कार्यस्थळावर करण्यात आला.

कारखान्याचे मार्गदर्शक संचालक व महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांचे कुशल मार्गदर्शनाखाली व चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली कारखाना प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे.

सहकार महर्षि कारखान्याकडे गत हंगाम २०२४-२०२५ मध्ये ऊस तोडणी वाहतूकीचे काम केलेल्या वाहन मालक यांची ऊस तोडणी वाहतूकीची संपुर्ण बिले अदा करणेत आली असलेची माहिती



कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र केरबा चौगुले यांनी दिली. गळीत हंगाम २०२५-२६ करीता कारखान्याने ९ लाख मे.टन ऊस गाळप करणेचे उदिष्ट ठेवले असुन बैलगाडी, बजाट, ट्रक, ट्रॅक्टर व ऊस तोडणी यंत्राचे मालक व ठेकेदार यांनी जास्तीत जास्त तोडणी वाहतूकीचे करार करून गाळप हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील यांनी केले.

या प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक सतीश शेंडगे,नानासाहेब मुंडफणे, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, अमरदिप काळकुटे, सुभाष कटके, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, धनंजय सावंत व विजयराज वाहतूक संघाचे चेअरमन केशव ताटे, राजेंद्र शिंदे, रमेश मिसाळ, कल्याणराव दुपडे, रामदास बेलदर, आगतराव शिंदे व सर्वसेवा संघाचे वसंत जाधव, विजय माने-देशमुख तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले तसेच बैलगाडी, बजाट, ट्रक, ट्रॅक्टर व ऊस तोडणी यंत्राचे मालक व ठेकेदार आणि खातेप्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्यासह बारा जणांचा भीमपुत्र आयडॉल पुरस्कार देऊन गौरव

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** संविधान विचार मंचच्या वतीने आयोजित भीमपुत्र आयडॉल 2025 हा राज्यस्तरीय पुरस्कार अकलूज येथील सामाजिक कार्यकर्त्या डॉ. स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील यांच्यासह अकरा जणांना देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार वितरण सोहळा दिनांक 20 एप्रिल 2025 रोजी बारामती येथील गदिमा सभागृह, विद्या प्रतिष्ठान, एमआयडीसी येथे अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास राज्यसभेच्या तालिका अध्यक्ष खासदार सुनेत्रा पवार आणि माजी खासदार डॉ.नरेंद्र जाधव यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमात विशेष पुरस्कारासाठी डॉ.स्वयंप्रभादेवी मोहिते पाटील यांची निवड करण्यात आली. त्यांनी गेली 33 वषार्पासून बॉटनिकल गार्डन, नक्षत्र गार्डन, पर्यावरण संवर्धन, वृद्धाश्रम व एड्स ग्रस्तांसाठी केलेली मदत, आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक यासह महिला सक्षमीकरणासाठी दिलेले योगदान अशा विविध उपक्रमांद्वारे समाजात मोलाचे योगदान दिल्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन राजेश कांबळे (अध्यक्ष), घनश्याम केळकर (सचिव) व मोहन गायकवाड (समन्वयक) यांच्या नेतृत्वाखाली



करण्यात आले होते. प्रा. संतोष जगताप, रूपाली गायकवाड, सुर्यकांत मोरे, सिद्धार्थ चव्हाण यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमात उपस्थित असलेल्या मान्यवरांनी संविधानाच्या मूल्यांची जोपासना करत नव्या पिढीसाठी प्रेरणादायी कार्य करण्याचा संदेश दिला. भीमपुत्र आयडॉल हा उपक्रम भविष्यातही नवनवीन कार्यकर्त्यांना समाजासाठी झटण्याची प्रेरणा देईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला. यावेळी समाजसेवा, शिक्षण, महिला सक्षमीकरण व पर्यावरण यासह विविध क्षेत्रात विशेष कार्य करणाया कल्पना सरोज, देवांश धनगर, डॉ. मुरहरी केळे, राजेश चंद्रा, शेख चांद पाशा, सुमन धामणे, सीए शंकर अदानी, हनुमंत उर्फ बाबुराव केंद्रे, डॉ.रोहन अकोलकर, मारुती बनसोडे, पांडुरंग सोनवणे यांनाही भीमपुत्र आयडॉल पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

# इंडियन ग्रीन बिल्डींग कार्पोरेशन नेस्ट प्लस या अंतर्गत सोलापुरातील इमारतीला नामांकन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आय.जी. बी.सी. नेस्ट प्लस म्हणजे इंडियन ग्रीन बिल्डिंग या सेंट्रल गव्हर्मेंट च्या संलग्न असलेल्या इमारतीच्या स्पर्धेत सहभागाकरिता सोलापूरच्या इफ्तेकार नदाफ यांच्या प्रोजेक्ट ला नामांकन मिळाले आहे. पॅन इंडिया अंतर्गत हा पहिला प्रोजेक्ट असून पश्चिम महाराष्ट्रासाठी हे अभिमानाचे क्षण असल्याचे त्यांनी सांगितले.केंद्र शासनाकडून ग्रीन बिल्डिंग साठी नामांक देण्यात येणाऱ्या आय.जी.बी. सी.नेस्ट प्लस या अंतर्गत संपूर्ण भारतातून सोलापूरला हा पहिला मान मिळालेला आहे. यात महत्त्वाची बाब म्हणजे या प्रोजेक्टसाठी ग्रेड ऑफ कॉंक्रीट टारगेट स्ट्रेंथ 26.6 इतकी होती. साइटवरील क्यूब स्ट्रेंथ 28.4 एम. पी. ए. इतकी मिळालेली आहे. शाश्वत कॉंक्रीटचे उत्कृष्ट उदाहरण नदाफ सर यांनी सोलापूरकर यांच्यासाठी उभे केलेले आहे.

आय.जी.बी.सी.नेस्ट प्लस या अंतर्गत इमारत गोल्ड रेटिंग यासाठी पात्र ठरत असल्याकारणाने वाढीव 5% इतका एफएसआय या बिल्डिंग साठी मिळणार आहे. या बिल्डिंगचे ठळक वैशिष्ट्य म्हणजे रेन वॉटर हार्वेस्टिंग, टॉप सॉइल रिझर्वेशन, युज ऑफ ग्रीन प्रॉडक्ट, रिडक्शन इन कार्बन इमिशन यामुळे 20% पाण्याची सेविंग होते. या सर्व बाबीमुळे चांगले वास्तू उभे राहून वापरण्यास अगदी आरामदायी होते.



हि इमारत मंत्री चंडक विहार होटगी रोड येथे असून सायन्स शिक्षक जुल्फेकार नदाफ हे या इमारतीचे मालक आहेत. आणि असोसिएशन ऑफ कन्सल्टिंग सिव्हिल इंजिनिअर चे माजी अध्यक्ष इत्तेकार नदाफ हे या प्रोजेक्टचे प्रोजेक्ट मॅनेजमेट कन्सल्टंट आहेत. नामवंत स्ट्रक्चर डिझायनर यश. एस. साळे हे आहेत. आर्किटेक म्हणून सुफवान दंडोती हे काम पाहत आहेत.

हे नामांकन मिळावे म्हणून इंजि. शितल राज सिंदखेडे एन आय बी एल चे इंजि. संगवे सर, इंजि. वैभव ढोणसळे, बाळासाहेब कुलकर्णी या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

आय.जी. बी.सी. नेक्स्ट प्लस या नामांकनामुळे बांधकाम क्षेत्रातील सर्व पदाधिकारी, सभासद यांनी इंजिनिअर इफ्तेकार नदाफ यांचे शुभेच्छा देऊन कौतुक केलेले आहे.

## जाहिर प्रसिध्दीकरण

नि. नं. ६
दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३३४/२०२५

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ज, सिनियर डिव्हीजन एस. ए. आर. सैय्यद साहेब,यांचे कोर्टात ५ वे सह दिवाणी न्यायाधीश व .स्तर.सोलापूर**

१) श्रीमती माधवी अरविंद जोशी
२) सौ. मिथीला विशाल कुलकर्णी
३) मधुरा अरविंद जोशी
} **अर्जदार**

**विरूध्द**

महाराष्ट्र शासन } **सामनेवाला**

ज्याअर्थी यातील अर्जदार यांनी मयत श्री. अरविंद नारायण जोशी यांचे नांवे असलेलेखाली नमुद मिळकतीचे वारसप्रमाणपत्र मिळणे करिता अर्ज दाखल केलेला आहे. सदरचे अर्जदाराशिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस नसल्या कारणाने प्रतिज्ञापत्र प्रस्तुत दिवाणी किरकोळ अर्ज नं. ३३४/२०२५ या किरकोळ अर्जामध्ये दाखल कला असून, सदर अर्जदारानी मे. कोर्टाकडे वारसप्रमाणपत्र मिळणे करिता अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी खालील नमुद मिकतीवर कोणाही कसलाही प्रकारचा अधिकार म्हणजेच खरेदी-विक्री, पोटगी, गहाण, दान, टाच, जप्ती, बक्षीस, लिज, लिन, बोजा, अक्वीजिशन, रिक्वीजिशन वगैरे तत्सम प्रकारचे हरकती असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० (तीस) दिवसाचे आत म्हणजेच दिनांक १२/०६/२०२५ रोजी किंवा त्यापुर्वी मे. कोर्टात कागदोपत्रानीशी, स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून सदर प्रकरणात आपली हरकत नोंदवी, मुदतीत कोणाचेही हरकत न आलेस, कोणाची हरकत नसल्याचे समजून एकतर्फी निकाल दिला जाईल मग कोणाचीही हरकत चालणार नाही.

मिळकतीचे वर्णन -

डि. व सब डि. तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दवाढ भागातील मौजे मजरेवाडी येथील यांसी जुना सर्व्हे नं. ३०३/१/१ब यांसी नवीन सर्व्हे नं.१५६/१/१ब या पैकी प्लॉट नं.१ (ले-आऊट प्लॉट नं.३३) याचे एकुण क्षेत्र ४९०.०० चौ.मी. यामध्ये बांधण्यात आलेल्या श्री. अपार्टमेंट पैकी दुसऱ्या मजल्यावरील सदनिका नं. ११ याचे एकुण क्षेत्र ३१.०४ चौ.मी. यांसी चतु:सिमा पुर्वेस टेरेस, व ओपन स्पेस ऑफ फ्लॅट, दक्षिणेस : फ्लॅट नं.१०,९, स्टेअरकेस व डक्ट, पश्चिमेस : स्टेअरकेस व ओपन स्पेस ऑफ फ्लॅट, उत्तरेस : ओपन स्पेस ऑफ फ्लॅट

ही जाहीर प्रसिध्दीकरण दिली तारीख २५/०४/२०२५.

**तारीख २५/०४/२०२५**
**स्थळ सोलापूर**

शिक्का

**अधिक्षकाची सही**
**मे.सि.ज.सि.डी., सोलापूर**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सह. सुत गिरणी सभा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सहकारी सुत गिरणीच्या सर्व सभासदासाठी विशेष सर्वसाधारण सभा रविवार दिनांक. 04 मे 2025 रोजी सकाळी 11.30 वाजता समाज कल्याण केंद्र, रंगभवन चौक, सोलापूर या ठिकाणी प्रशासक तथा वस्त्रोद्योगच्या प्रादेशिक उप आयुक्त श्रीमती उज्वला पळसकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

वस्त्रोद्योग आयुक्त यांच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 चे कलम 77 अ/ कलम 78 अन्वये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय सह. सुत गिरणी, सोलापूर येथे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. सुत गिरणीच्या कामकाजासाठी 97 घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने सुत गिरणीस आदर्श उपविधी स्विकारणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. आदर्श उपविधी स्विकृतीनंतर सदर सुत गिरणीचे कामकाज करणे सोईचे होणार आहे.गणपूर्ती अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. याची सर्व सभासदानी नोंद घ्यावी.

# चाईल्ड हेल्प लाईन 1098 ची यंत्रना सतर्क

**सोलापूर(कटूसत्य वृत्त):-**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय व जिल्हा बाल संरक्षण कक्ष अंतर्गत चाईल्ड हेल्प लाईन 1098 शासकीय यंत्रणा, अक्षय तृतीया च्या शुभमुहूर्तावर होणारे बालविवाह थांबविण्यासाठी सतर्क असल्याची माहिती जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर.बी.काटकर यांनी दिली. भारतीय संस्कृतीत विवाह ही समाजातील महत्वाची आणि सार्वत्रिक सामाजिक क्रिया आहे. साहजिकच शुभमुहूर्तावर विवाह विधी केल्या जातात. अक्षय तृतीय हा महत्वाचा मुहूर्त असल्याने या शुभ मुहूर्तावर सामुदायीक तसेच एकल विवाह समारंभ आयोजित केले जातात. यामध्ये बालविवाहांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अक्षय तृतीयेच्या मुहूर्तावर होणाऱ्या विवाहात बालविवाह होऊ न देणे कारण बालविवाह ही प्रथा बाल हक्कांच्या विरोधी असून बालविवाह प्रतिबंधक अधिनियम 2006 नुसार असे विवाह बेकायदा ठरतात आणि याविरोधात गुन्हा नोंदविला जातो.

चाईल्ड हेल्प लाईन 1098 हे ज्या बालकांना काळजी व संरक्षणाची गरज आहे अशा बालकांना सेवा पुरविते. यात रस्त्यावरील बालके, बालकामगार, शोषित बालके, देह विक्रीस बळी पडलेली बालके, व्यसनाधीन बालके, संघर्षग्रस्त बालके, मतिमंद बालके, एच. आय. व्ही. एड्स ग्रस्त बालके, आपत्तीग्रस्त बालके, कौटुंबिक कलहास बळी पडलेली बालके, वैद्यकिय मदतीसाठी, निवाऱ्याच्या शोधात असलेले, हरवलेले बालके परत पाठवणेसाठी, शोषणापासून संरक्षण, भावनिक मदत व मार्गदर्शन, माहिती व संदर्भ सेवेकरिता चाईल्ड हेल्प लाईन 1098 हि 24 तास मोफत सहाय्य करणारी महाराष्ट्र राज्य, महिला व बाल विकास विभागाची राष्ट्रीय दुरध्वनी सेवा आहे. आणि माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येते. बालविवाह प्रतिबंधक अधिनियम 2006 नुसार विवाहातील मुलीचे वय 18 वर्षे व मूलाचे वय 21 वर्षे पुर्ण असले पाहिजे जर वय त्यापेक्षा कमी असले तर ते बालविवाह मानले जाते. जर कोठे आपल्या आसपास बालविवाह होत असल्यास स्थानिक पोलीस स्टेशनला, जिल्हा बाल संरक्षण कक्ष अथवा चाईल्ड हेल्प लाईनच्या टोल फ्री नंबर 1098 वर कळवावे असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर.बी.काटकर यांनी केले आहे.

## Classified - छोटी जाहीरात

### विकणे आहे

- सोलापूर - अक्कलकोट रोड टच कोन्हाळी येथे 5 एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - पुणे हायवे रोड टच वडाची वाडी येथे साडे सहा एकर जमीन विकणे आहे
- सोलापूर - तुळजापूर रोड टच उळे येथे 33 गुंठे जमीन विकणे आहे
- गुळवंची - कोंडी रोड टच प्रति गुंठा 1 लाख प्रमाणे 11-11 गुंठे जमीन विकणे आहे.
- सोलापूर सिटीत संभाजी चौक ते रेल्वे ट्रॅक रोड टच प्लॉट विकणे आहे

मो. 9860848471/ 7741077411

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.

-: संपर्क :-
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
फोन: 9552619752
कॉल / व्हॉटस्ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

# नावात बदल

**आयुब अमिन मुलाणी पटेल** आणि **आयुब अमिन पटेल** वय. ४२,रा.बार्डी.जि. सोलापुर. या दोन्ही नावाची व्यक्ती एकच आहे.

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) दबंग चित्रपटातील एक अभिनेता, सलमानचा भाऊ २) नॅपकिन (मराठीत) ३) तुरूंग (इंग्रजीत) ४) दूध मोजण्याचे प्रमाण ५) अफगाणिस्तानची राजधानी ६) मला ७) रसदार १०) खडबडीत (इंग्रजीत) १२) नशीब (इंग्रजीत) १४) घरातील कपडे व महत्त्वाच्या वस्तू ठेवण्याची मोठी उभी पेटी १५) कापड फाटताना होणारा आवाज १६) भांड्याना कलई करताना वापरतात तो पांढरा खनिज पदार्थ २०) धावपट्टू (इंग्रजीत) २२) ब्रेड (मराठीत) २३) मुलगा (हिंदीत) २६) मेडल (मराठीत) २७) संस्थेचा सदस्य २८) वर्षाच्या सुरूवातीचा महिना ३०) नऊ+आठ ३२) कागदाचा चतुर्थांश भाग, कॉलम ३४) एक अभिनेत्री-*** टंडन ३६) वस्त्र ३७) चौदा दुणे ४०) दृष्टी ४१) अरण्य, एक (इंग्रजीत) ४२) कष्ट करण्याने दमणे ४३) सांडपाणी वाहणारा नाला ४५) पाणी ४८) शाहिराचे वाद्य ४९) निवडणुकीत उमेदवाराला व्होट देणे-**दान

**आडवे शब्द :** १) भारताचे दिवंगत झालेले केंद्रीय अर्थमंत्री ५) कष्ट करणारा श्रमिक ८) श्री लक्ष्मीदेवीचे एक नाव ९) कलिंगडाप्रमाणे एक फळ ११) मनातील खंत १३) लहान मूल १५) बी च्या वरील आवरण, फोलकट १६) स्वर्गच्या विरूध्दार्थी १७) दोन लाकडी वस्तू जोडण्यासाठी त्यामध्ये बसविलेला निमुळता लाकडी तुकडा १८) आईची बहीण १९) मीठाची चव २१) पत्र २४) पाच+दोन २५) ख्रिश्चन धर्मसेविका २६) वाईट अवस्था, दुर्दशा २७) गस उलट लिहा २९) सैन्याला पुरविला जाणारा दाणागोटा ३१) कामकाज ३३) नशीब (हिंदीत) ३५) सातारा जिल्ह्यातील फुलांसाठी प्रसिध्द असलेले पठार ३६) छ. शिवरायांची लढाई पध्दत-गनिमी ** ३७) नऊ दुणे ३८) छंद, आवड ३९) कथेतील पंख असणारी स्त्री ४०) नऊ नाथ देव ४३) किल्ला ४४) वळीव पावसावेळी आकाशात कडाडणारी ४६) लोक ४७) चवीला कडू ५०) कुत्र्याचा जोडीदार ५१) पाण्याचे बाष्परूप ५२) चांदी

## सुडोकु - 235

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 4 | 9 | 6 | 2 | 3 | | |
| | 6 | | 1 | | | 4 | | |
| 8 | 2 | | 3 | 7 | | | | 6 |
| | | 1 | 4 | | 6 | | 2 | |
| | | 2 | 7 | 5 | | | | |
| | 9 | 3 | 2 | | | 7 | | 4 |
| 2 | 7 | | | 3 | | 9 | 4 | |
| 1 | | | | | | 2 | 7 | 5 |
| 9 | | | 8 | 2 | | | | 1 |

# सोलापूरातील विविध प्रश्न मार्गी लावा

## संभाजी ब्रिगेडची पालकमंत्र्याकडे मागणी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहरातील अनेक विविध प्रश्न राजकीय अनास्था मुळे व महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे करोड रुपये खर्च करून अनेक कामांची दुरवस्था झालेली असून सर्वसामान्य जनतेचे करोडो रुपये वाया गेलेले दिसून येत आहे त्यामुळे आपण जातीने लक्ष घालून महानगरपालिका प्रशासन व अधिकाऱ्यांना समज देण्यात यावी व सोलापुरातील प्रश्न मार्गी लावण्यासाठी स्वतः जातीने लक्ष द्यावे असे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने पालकमंत्री जयकुमार गोरे यांना भेटून देण्यात आले



सोलापूर शहरांमध्ये आंतरराष्ट्रीय दजार्चे जलतरण केंद्र गेल्या पाच सहा वर्षापासून बंद आहे त्यामुळे अनेक जलतरुपटूंची गैरसोय होत आहे फक्त वीस–पंचवीस लाखांमध्ये हा आंतरराष्ट्रीय जलतरण तलाव दुरुस्त होऊ शकतो पण जिल्हा क्रीडा अधिकारी मनावर घेत नाहीत त्यांना याबाबत समज देण्यात यावी.

2) सोलापूर शहरातील करोड रुपये खर्चून एडवेंचर पार्क सिद्धेश्वर मंदिरातील लेझर शो तसेच सोलापूर शहरातील सर्व उद्याने बंद आहेत तसेच सोलापुरातील प्राणी संग्रहालय सुद्धा बंद आहे याबाबत महानगरपालिका प्रशासनास याबाबत समज देण्यात यावी. 3) जुळे सोलापूर भागातील आसरा रेल्वे पूल रुंदीकरणाचे काम 2022 पासून नितीन गडकरी साहेबांनी निधी देऊन सुद्धा जल वहिनी काढण्यासाठी तीन वषार्पासून प्रलंबित आहे याबाबत सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांना आदेश देण्यात यावे.

4) सोलापूर विमानसेवा तातडीने सुरू करण्यात यावी सोलापूर विमान तळास छत्रपती संभाजी महाराज विमानतळ असे नामकरण करण्यात यावे .

5) उजनी समांतर जलवाहिनीचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावेत तसेच सोलापूर शहरात उजनी धरणातून पाणीपुरवठा केला जातो पण सोलापूर महानगरपालिकेचे वतीने जलशुद्धीकरण केंद्रांमध्ये व्यवस्थित जल शुद्धीकरण केले जात नाही काही मशनेरी बंद आहेत त्यामुळे दूषित पाणीपुरवठ्यामुळे सोलापुरात अनेक जण मृत्युमुखी पडलेले आहेत याबाबत शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यास आदेश द्यावेत.

6) छत्रपती शिवाजी महाराज सर्वपचार रुग्णालयातील सिटीस्कॅन मशीन अनेक दिवसापासून बंद आहे सिटीस्कॅन मशीन सोलापुरा उपलब्ध होऊन सुद्धा अद्याप ती यंत्रणा कार्यान्वित झालेली नाही ते तातडीने सुरू करण्याचे आदेश अधिष्ठाता यांना देण्यात यावे.

7) सोलापूर शहरांमध्ये मोठ्या प्रमाणात महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने अतिक्रमण संबंधित अतिक्रमण काढण्यासाठी माननीय आयुक्त साहेब यांना आदेश व्हावेत.

8) सोलापूरचे ग्रामदैवत श्री सिद्धारमेश्वर यांच्या प्रवेशद्वाराजवळ सार्वजनिक शौचालय बांधण्यात आलेल्या आहे ते शौचालय तिथून हटवून इतर जागी हलवावेत ही तमाम सोलापूरकर वासियांची भावना असून त्या भावनेचा आदर राखून तेथील शौचालय बंद करण्यात यावे

9) शासनाच्या विविध योजनांसाठी बँका कर्ज देण्यास टाळाटाळ करीत आहेत याबाबत माननीय जिल्हाधिकारी यांनी तातडीने सर्व बँकेच्या अधिकाऱ्यांशी बैठक घेऊन शासकीय योजनेसाठी कर्ज देण्यासाठी बँकेला आदेश द्यावेत.

10) सोलापूर शहरांमध्ये मोठे उद्योगधंदे येण्यासाठी शासन दरबारी प्रयत्न व्हावा .

11) काही दिवसांवर पावसाळा येऊन ठेपलेला आहे पावसाळ्याची शक्यता गृहीत धरून सोलापूर शहरातील सर्व नालेसफाई चे कामे तातडीने करण्यात यावेत यासाठी निधी मंजूर करावा.

सोलापुरातील बंद पडलेली परिवहन सेवा पुनश्च तातडीने सुरू करण्याची यावी.

या मागण्या निवेदनात करण्यात आल्या.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले शहराध्यक्ष शिरीष जगदाळे शहर सचिव सिद्धाराम साबळे शहर संघटक शेखर कंकर जिल्हा संघटक दिलीप निंबाळकर शहर संघटक राजशेखर स्वामी आधी उपस्थित होते

# शेतकरी कर्जमाफीसाठी संभाजी ब्रिगेडचा अजित पवारांना घेराव

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):–** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे काल टेंभुर्णी येथे खाजगी कार्यक्रमासाठी आले असता संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी कर्जमाफीसाठी अजित पवार यांना घेराव घालुन निवेदन दिले.गेल्या कित्येक दिवसांपासून शेतकरी अडचणीत असुन निसर्गाचा लहरीपणा, सततची नापीकी, बॅकाचा तगादा, शेतीमालास कवडीमोल भाव,वाढलेला उत्पादन खर्च या बाबींमुळे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होत असुन शेतकरी बांधवांना मदत म्हणून सरसकट कर्जमाफी देऊन आपण विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासन ही या निमित्ताने पूर्ण करून शब्द पाळावा असे निवेदनाद्वारे सचिन जगताप यांनी मांडले यावेळी सचिन खुळे–ता.कार्याध्यक्ष,योगेश मुळे–शहराध्यक्ष, नवनाथ रेपे,सुनील ढवळे,विजय काळे,संजय देशमुख, शरद लिगाडे, महेश देशमुख,अमोल पाटील, उमेश जगताप ई. उपस्थित होते.



# मुंबईच्या वेव्हज परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):–** केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ–व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज 2025 परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. 1 ते 4 मे 2025 या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज परिषदेत जगभरातून 100 पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे. या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार (टडव) करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# बबनदादांनी मंजूर केलेल्या विकासकामांचे फुकटचे श्रेय विरोधकांनी घेऊ नये – शंभूराजे मोरे

**माढा (कटूसत्य वृत्त):–** विधानसभा निवडणुकीपूर्वी तत्कालीन आमदार बबनराव शिंदे यांनी मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री व ऊजार्मंत्री यांच्याकडे सातत्याने पाठपुरावा करून माढा विधानसभा मतदारसंघात गरजेनुसार 12 ठिकाणी नवीन ट्रान्सफार्मरला मंजुरी घेतली होती त्यानंतर सर्व तांत्रिक बाबींची पूर्तता होऊन सर्व नवीन ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित होण्याची कामे आता पूर्ण होत आहेत त्यामुळे बबनदादांनी मंजूर केलेल्या कामांचे फुकटचे श्रेय विरोधकांनी घेऊ नये असा टोला जिल्हा दूध संघाचे संचालक शंभूराजे मोरे यांनी कोणाचेही नाव न घेता लगावला आहे.



### शनिवारी होणारे रास्ता रोको आंदोलन स्थगित

उपळाई खुर्द येथील 33 के.व्ही.सबस्टेशनमधून होणारा वीजपुरवठा कमी दाबाने व सतत खंडित होत होता त्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत होते त्यामुळे आम्ही माढा महावितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता यांना दिलेल्या निवेदनाद्वारे शनिवारी 26 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता स स्टेशन समोरील माढा ते मोहोळ रस्त्यावर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला होता परंतु महावितरणचे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी बहुतांश कामे वेळेत पूर्ण करून आमच्या मागण्या मान्य केल्यामुळे शनिवारी सकाळी होणारे रास्ता रोको आंदोलन आम्ही स्थगित करीत असल्याचे सरपंच संदीप पाटील,सरपंच संतोष लोंढे,सरपंच प्रतिनिधी प्रदिप चौगुले व बाळासाहेब इंगळे यांनी सांगितले आहे.

ते उपळाई खुर्द ता.माढा येथील 33 के.व्ही. सबस्टेशनमध्ये माजी आमदार बबनराव शिंदे यांच्या प्रयत्नातून मंजूर नवीन 5 एम. व्ही. ट्रान्सफार्मरचे उद्घाटन करताना शुक्रवारी सायंकाळी 25 एप्रिल रोजी बोलत होते.

या नवीन ट्रान्सफॉर्मरचे उद्घाटन पंचायत समितीचे सभापती विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रास्ताविक ॲड.सुरेश पाटील यांनी केले.

यावेळी विक्रमसिंह शिंदे यांनी सांगितले की, माजी आमदार बबनराव शिंदे यांनी सर्वसामान्य जनता व शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून विकासकामे केलेली आहेत. हे नवीन सबस्टेशन सुरू झाल्यामुळे उपळाई खुर्द, अंजनगाव खेलोबा, विठ्ठलवाडी, लोंढेवाडी, खैरेवाडी व गोरेवाडी येथील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. भविष्यात या भागातील जनतेचे प्रश्न व समस्या सोडवण्यासाठी आम्ही सदैव कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी महावितरण कंपनीचे सहाय्यक अभियंता शिवम कांबळे व त्यांच्या स्टाफने उपळाई खुर्द ते 30 के.व्ही. सबस्टेशन मधील पेंडिंग व अर्धवट कामे निर्धारित वेळेत पूर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार सभापती विक्रमसिंह शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी सरपंच संदीप पाटील, उपकार्यकारी अभियंता उद्धव जाधव, सहाय्यक अभियंता शिवम कांबळे, दिपक पाटील, प्रदीप चौगुले, सरपंच संतोष लोंढे, बाळासाहेब इंगळे, सुरेश पाटील, विनायक चौगुले, महादेव गडेकर, नाना वाघमोडे, मदन आलदर, चंद्रकांत व्होनमाने, शिवाजी गोरे, चंद्रकांत मासाळ, राजेंद्र गुंड, कैलास सस्ते, अक्षय सलगर, अमोल आयवळे, उमेश भाकरे, पांडुरंग बोबडे, जनार्दन कदम, हनुमंत मोहिते, सत्यवान कदम, बाळासाहेब कदम, राजाभाऊ शिंगाडे, बाळू बोराडे, रवींद्र शिंगाडे, शिवाजी कदम, महादेव पाटील, कुबेरदास कदम, संतोष कदम, रवींद्र पाटील, रमेश पाटील, विलास बोराडे, हसन तांबोळी, अनिल वाघमोडे, संभाजी पाटील,विक्रम पाटील,शुभम पाटील, दिलीप पाटील,अरुण माने, सुधीर मोहिते, दिगंबर गडदे, सुधीर अनभुले, प्रशांत कदम, बाबा शिंदे, पंकज गडदे, संदीप कदम,राजू कदम यांच्यासह ग्रामस्थ व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये इंग्रजी दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सोलापूर शहरातील नागेश करजगी ऑर्किड स्कुल मध्ये जागतिक इंग्रजी दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाट्न शाळेच्या मार्गदर्शिका मीनाताई पारखे यांच्या हस्ते दिप प्रज्वलन करून करण्यात आले.यावेळी शाळेचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी,प्राचार्या रुपाली हजारे,इंग्रजी विभाग प्रमुख तुलसी चितारी,इमरान सय्यद आदी उपस्थित होते.

याप्रसंगी शाळेच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेमध्ये विविध पोस्टर निर्मिती केली होती याचे प्रदर्शन करण्यात आले.तसेच विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषा आपल्यासाठी कशी महत्वाचे आहे हे आपल्या भाषणामधून सांगितले.

कार्यक्रमा प्रसंगी शाळेच्या मार्गदर्शिका मीनाताई पारखे यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा ही आपल्या सर्वांसाठी महत्वाची भाषा आहे.त्यामुळे सर्वांनी आपल्या रोजच्या संवादात या भाषेचा वापर केला पाहिजे असे सांगितले. संस्थेचे प्रमुख डॉ. कुमार दादा करजगी व संस्थेच्या सचिवा वषार्ताई विभुते यांनी इंग्रजी दिनाच्या सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शाळेच्या विद्याथीर्नी स्नेहल डोके व उत्कर्षा जाधव यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागप्रमुख आनंद लिगाडे, सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# बसवण्णांनी देवाला भक्तांच्या हातात दिला – गिरीश जाखोटिया

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** बसवण्णांनी मानवी शरीराला मंदिर म्हणून संबोधले. मानवी शरीरातील पाय हे मंदिराचे खांब आहेत. धड हे मंदिराचे शिखर आहे आणि डोके हे कळस आहे. बाराव्या शतकात त्यांनी मानवाला इष्टलिंग धारण करण्यास सांगितले. अशा पद्धतीने त्यांनी देवाला भक्तांच्या हातात दिला असे प्रतिपादन गिरीश जाखोटिया यांनी केले.



वीरशैव व्हिजन बसव व्याख्यानमालेचा शुभारंभ प्रसंगी आ. विजयकुमार देशमुख, आ. प्रवीण स्वामी, वक्ते डॉ. गिरीश जाखोटिया, प्रकाश वाले, अण्णासाहेब कोतली, राजशेखर बुरकुले, विजयकुमार बिराजदार

वीरशैव व्हिजन बसव व्याख्यानमालेचे पहिले पुष्प गुंफताना ते बोलत होते. याप्रसंगी मंचावर आ. प्रवीण स्वामी (उमरगा), सोलापूर जिल्हा नागरी बँक असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश वाले, दक्षिण सोलापूर शिक्षण मंडळ विश्वस्त अण्णासाहेब कोतली, वीरशैव व्हिजनचे संस्थापक अध्यक्ष राजशेखर बुरकुले, उत्सव समितीचे अध्यक्ष विजयकुमार बिराजदार यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना जाखोटीया म्हणाले की, आज 21 व्या शतकात स्त्रियांना आरक्षण देण्याचा प्रयत्न सुरु आहे. मात्र बसवण्णांनी 12 व्या शतकातच अनुभव मंटपामध्ये स्त्रियांना प्रवेश दिला. ते खरे स्त्री आरक्षणाचे जनक आहेत. स्वातंत्र्यानंतर अनेक वर्षांनी सामाजिक न्याय विभाग सुरु झाला. मात्र बसवण्णांनी आपल्या अनुभव मंटपात सर्वच जाती धर्मांना सामावून घेतले. त्यामुळे बसवण्णा सामाजिक सुधारण्याचे आद्य क्रांतिकारक आहेत.

यावेळी शिवानंद भरले, अशोक खानापुरे, शिवलिंगप्पा शाबादे, अनिल गिराम, विजय काडादी, मनोज पाटील, आनंद दुलंगे, बसवराज चाकाई, श्रीमंत मेरू, श्रीकांत कट्टीमनी, नागेश बडदाळ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजशेखर बुरकुले यांनी केले. उपस्थितांचे स्वागत सोमेश्वर याबाजी यांनी केले. सूत्रसंचालन अरुंधती शेटे आभार प्रदर्शन विजयकुमार बिराजदार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अविनाश हत्तरकी, सोमनाथ चौधरी, बसवराज जमखंडी, शिव कलशेट्टी, सिद्धेश्वर कोरे, गौरीशंकर अतनुरे, आनंद नसली यांनी परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही मूल्यांवरच भारतीय समाजव्यवस्था उभी : सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

**मुंबई (कटूसत्य वृत्त):–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लोकशाही मूल्यांवरच भारतीय समाजव्यवस्थेची भक्कम रचना उभी असल्याचे प्रतिपादन सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी केले. लंडनमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'न्याय, समानता आणि लोकशाहीची पूर्वकल्पना– जागतिक दृष्टिकोन' या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. यावेळी केंद्रीय माहिती व प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन उपस्थित होते.

ही आंतरराष्ट्रीय परिषद बार्टी, ग्रेस इन सोसायटी, लंडन, मुंबई विद्यापीठ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी, लंडन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली. या परिषदेमध्ये जगभरातील नामवंत अभ्यासकांनी सहभाग घेतला.या परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर संशोधन करणाऱ्या संशोधकांचे संशोधन प्रबंध प्रसिध्द करण्यात आले. यावेळी सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव डॉ.हर्षदीप कांबळे उपस्थित होते.



# बाभूळगाव येथे ज्योतिबा यात्रेनिमित्त विविध कार्यक्रम राम सातपुते यांची उपस्थिती

**माळीनगर (कटूसत्य वृत्त):–** बाबुळगाव ता माळशिरस येथील ज्योतिबा यात्रेनिमित्त गावामध्ये सोमवार दि 21 ते बुधवार दि 23 पर्यंत सलग तीन दिवस विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते पहिल्या दिवशी देवाची प्रतिमा व पादुकांचा छबिना काढण्यात आला, यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली, दुसऱ्या दिवशी, ह भ प लक्ष्मण महाराज राजगुरू, यांचा भारुडाचा कार्यक्रम तर तिसऱ्या दिवशी जि.प शाळेच्या भव्य पटांगणावर कुस्त्यांचे जंगी मैदान घेण्यात आले होते.



कुस्तीच्या मैदानाचे उद्घाटन मा आ राम सातपुते यांनी केले यावेळी शिवसेनेचे नामदेव वाघमारे, भाजपाचे युवा नेते विक्रम उर्फ सोनू पराडे पाटील, नागेश पराडे पाटील, शंकर पराडे बाबासाहेब पराडे, शहाजी पराडे, पोपट सूर्यवंशी, पंजाबराव सूर्यवंशी, तंटामुक्ती अध्यक्ष चंद्रकांत सूर्यवंशी, सुग्रीव मिटकल, भूषण पराडे पाटील, अण्णासाहेब शिंदे. संतोष राऊत.मिलिंद मोरे, अंकुश वाघ शंकर पराडे,सत्यवान सूर्यवंशी, माणिक मिसाळ, बाळासाहेब जाधव, बाबासाहेब पराडे, लालासाहेब गोडसे, योगेश शेंडगे, लालासाहेब पराडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

शेवटची 51 हजार मानाची कुस्ती सुरज कोकाटे विरुद्ध हर्षद दानोळे कोल्हापूर यांच्यामध्ये झाली यामध्ये सुरज कोकाटे यांनी बाजी मारली तसेच बाभुळगाव चे उत्कृष्ट विजयी मल्ल सिद्धनाथ पराडे यास बाबुळगाव मैदानाची मानाची गदा देऊन गौरव करण्यात आला या मैदानावर 100 रुपये ते 8000 हजार रुपये पर्यंत कुस्त्या जोडण्यात आल्या मैदानात महिला कुस्तीपटूंच्या कुस्त्या सर्वांचे आकर्षण ठरल्या कुस्ती मैदान यशस्वी करण्यासाठी लालासाहेब पराडे, देविदास पराडे, पांडुरंग मिटकल, चंद्रकांत पराडे, बाबासाहेब माने – देशमुख, धनाजी पराडे, संतोष पराडे, अमोल सूर्यवंशी, सुनील पवार यांनी विशेष परिश्रम घेतले तर कुस्ती निवेदक रामभाऊ देवकाते व प्रा.बाळासाहेब पराडे यांनी केले.


## महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग,

### निविदा सूचना क्र. ०१ सन २०२५–२६

खालील कामाच्या सिलबंद निविदा नमुना ब – १ मध्ये कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग उजनी वसाहत सोलापुर दूरध्वनी क्र. ०२१७–२९९०७१४ हे खालील प्रकारच्या कामाचा पुर्वानुभव असलेल्या ठेकेदारांकडून मागवित आहेत. कोऱ्या निविदेचा नमूना कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग उजनी वसाहत सोलापुर. यांचेकडून खाली निर्देशित केलेल्या कालावधीमध्ये कार्यालयीन वेळेत सकाळी ११.०० ते ४.०० वाजेपर्यंत दूसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार व सार्वजनिक सुटया सोडून देण्यात येईल. कार्यकारी अभियंता, हे भरून पाठविलेल्या सिलबंद निविदा रकाना क्र. ९ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापर्यंत दुपारी ०२.०० वाजेपर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी दुपारी ४.०० वा कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग उजनी वसाहत सोलापुर. यांचे कार्यालयात उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रूपये) (जीएसटी वगळून) | बयाणा रक्कम (रूपये) | काम पूर्ण करण्याचा कालावधी | पुरवठ्याचे ठिकाण | निविदा फॉर्म कोणास देय आहे. | विक्री कालावधी. | स्विकृती व उघडण्याचा दिनांक. | कोऱ्या निविदा फॉर्मची किंमत. | सुरक्षा ठेव रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | देगाव उपसा सिंचन योजनेसाठी पंपगृहामध्ये तलांक ४४३.०० मी वर पंप मोटर व विद्युत उपकरणांच्या सुरक्षिततेसाठी अर्थमॅट जाळीचा पुरवठा व उभारणी करणे काम | ७६६५९७/– | ७७००/– | ०३ महिने पुरवठा आदेशाच्या दिनांकापासून | देगाव | अशा प्रकारच्या कामाचा पूर्वानुभव असणाऱ्या ठेकेदारास | ३०/०४/२०२५ ते ०८/०५/२०२५ | ०९/०५/२०२५ | रु.१०००/– (अधिक १८० जीएसटी) रु.११८०/– (रु.१३००/– पोस्टाने मागविल्यास) | १५४००/– |

१) कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग उजनी वसाहत सोलापुर यांचे कार्यालयात नोटीस बोर्डवर सविस्तर निविदा सूचना पहावयास मिळेल. २) कोऱ्या निविदेची किंमत केवळ रोखीने किंवा शासनास ऑनलाईन प्रदानाद्वारे/ डिमांड ड्राफ्ट द्वारे स्विकारण्यात येईल. ३) सदर निविदा पोस्टाने पाठविल्यास सिलबंद पाकिट देवाण घेवाण करण्यात खराब झाल्यास किंवा निविदा मिळण्यास विलंब झाल्यास त्यासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. ४) अटी व शर्ती असणाऱ्या एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा हक्क कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

**अर्हता:–** १) सविस्तर निविदा सूचने मध्ये नमुद केल्या प्रमाणे ज्यानी अशा प्रकारची मागील तीन वर्षात तत्सम प्रकारची व किमान निविदा किंमती एवढे रकमेची किमान कामे करुन मागणीदारांना समाधानकारकरित्या पुरवठा केलेले आहे त्यांनी आवश्यक ती प्रमाणपत्रे कंत्राटदाराने कार्यालयास निविदा घेतेवेळी उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे. २) अशा प्रकारच्या कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत सादर केल्याशिवाय कोरी निविदा कागदपत्रे दिली जाणार नाहीत. ३) जे कंत्राटदार वरील नमुद केलेल्या आवश्यक अटींपैकी एकही अट पूर्ण करु शकणार नाहीत त्यांना निविदापत्र दिले जाणार नाही. ४) यांत्रिकी संघटनेअंतर्गत कंत्राटदाराने नोंदणीकृत असणे आवश्यक नाही.

जावक क्रमांक/या. वि/लेखा–२/निविदा/६७९/सन २०२५ दिनांक:– २२/४/२०२५
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी विभाग उजनी वसाहत सोलापुर

जिमाका/सो/जाहि/१९/२०२५–२६

सही/–
**कार्यकारी अभियंता,**
**यांत्रिकी विभाग, सोलापुर**